अनेक तीर्थें या गोमतीतीरीं । अघविनाशक जेथील वारी ।
भवरोग स्नानें पानें निवारी । पुराणांतरी वर्णिले ।।३२।।

ते हे गोदा अहमदनगरीं । कोपरगांव तालुक्याभीतरीं ।
कोपरगांवाचिया शेजारीं । मार्ग देई शिरडीचा ।।३३।।

गोदा वळंघूनि पैलतीरीं । सुमारे तीन कोसांवरी ।
तांगा प्रवेशतां निमगावांभीतरीं । समोर शिरडी दिसतसे ।।३४।।

निवृत्ति ज्ञानदेव मुक्ताबाई । नामा जनी गोरा गोणाई ।
तुका नरहरी नरसीभाई । सजन कसाई सांवता ।।३५।।

पूर्वी संत होउनि गेले । सांप्रतही ते बरेचि झाले ।
वसुधैवकुटुंबी भले । आधार रंजल्यागांजल्यांचे ।।३६।।

रामदास संतप्रवर । सोडूनिया गोदातीर ।
प्रकट झाले कृष्णातटाकावर । जगदुध्दाराकारणें ।।३७।।

तैसेचि हे योगेश्वर साई । महान शिरडीची पुण्याई ।
जगध्दुअदाराचिये पायीं । गोदेठायीं अवतरले ।।३८।।

परिस लोहा दे कनकस्थिति । तया परिसा संतां उपमिति ।
संतांची परी अलौकिक कृति । निजरुप देती भक्तांतें ।।३९।।

सांडूनियां भेदभाव । स्थिरचर अवघें ब्रम्हस्वभाव ।
आपणांसी हें विश्वविभव । अखंड वैभव ब्रम्हाचें ।।४०।।

ऐसें अखिल विश्व जेव्हां । मीच मी हें प्रबोधेल तेव्हां ।
मग त्या सुखाचा काय सुहावा । परम सद्भावा पावेल ।।४१।।

ऐसें मीपण जेव्हां पावावें । वैर तें करावें कोणासवें ।
किमर्थ वा कवणासी भ्यावें । अन्यचि ठावें जंव नाहीं ।।४२।।

दामाजी जैसे मंगळवेढीं । समर्थ रामदास सज्जनगडीं ।
नृसिंहसरस्वती जैसे वाडीं । तैसेचि शिरडीं साईनाथ ।।४३।।

परम दुर्घट आणि दुस्तर । जिंकिला जयानें हा संसार ।
शांति जयाचा अलंकार । मूर्त भांडार ज्ञानाचें ।।४४।।

वैष्णवांचें हें माहेरघर । उदारांचा हा उदार ।
परमार्थ-कर्णाचा अवतार । साराचें सार हा साई ।।४५।।



प्रीति नाहीं नाशिवंतीं । आत्मस्वरूपीं रंगली वृत्ति ।
लक्ष एक परमप्राप्तीं । काय ते स्थिति वर्णावी ।।४६।।

ऐहिकाचा न उत्कर्षापकर्ष । आमुत्रिकाचा न हर्षामर्ष ।
अंतरंग निर्मल जैसा आदर्श । वाचा वर्षत अमृत सदा ।।४७।।

राजा रंक दरिद्री दीन । जयाचे दृष्टीं समसमान ।
स्वयं ठावा न मानापमान । भूतीं भगवान भरलेला ।।४८।।

जनासवें बोले चाले । पाही मुरळयांचे नाच चाळे ।
गज्जल गाणें ऐकतां डोले । रेस न हाले समाधि ।।४९।।

'अल्ला' नामाची जया मुद्रा । जग जागतां जया ये निद्रा ।
जागे जगासी लागतां तंद्रा । शांत समुद्रासम उदर ।।५०।।

आश्रम-निश्चय काही नकळें । कांहीं निश्चित कर्मा नातळे ।
बहुधा बैसल्या ठायींचा न ढळे । व्यवहार सगळे जो जाणे ।।५१।।

दरबाराचा बाह्य थाट । गोष्टी सांगे तीनशें साठ ।
ऐसा जरी नित्याचा थाट । मौनाची गांठ सोडीना ।।५२।।

भिंतीस टेकूनि उभे असती । सकाळ दुपारा फेरी फिरती ।
लेंडीवरी वा चावडीस जाती । आत्मस्थिती अखंड ।।५३।।

न जाणूं कवण्या जन्मांतरीं । कवण्या प्रसंगीं कवण्या अवसरीं ।
केलें म्यां तप कैशियापरी । घेतलें पदरीं साईनें ।।५४।।

हें काय म्हणावें तपाचें फळ । तरी मी तो जन्माचा खळ ।
साईच स्वयें दीनवत्सल । कृपा ही निश्चळ तयाची ।।५५।।

सिध्दकोटींत जरी जनन । साधकाऐसें तयाचें वर्तन ।
वृत्ति निरभिमान अतिलीन । राखी मन सकळांचें ।५६।।

नाथांहीं जैसें पैठण । ज्ञानदेवांहीं आळंदी जाण ।
तैसेंचि साईनीं शिरडी - स्थान । महिमासंपन्न केलें कीं ।।५७।।

धन्य शिरडीचे तृण पाषाण । अनायासें जयां अनुदिन ।
घडलें बाबांचे चरणचुंबन । पदरजधारण मस्तकीं ।।५८।।

शिरडीच आम्हा पंढरपुर । शिरडीच जगन्नाथ द्वारकानगर ।
शिरडीच गया काशी विश्वेश्वर । रामेश्वरही शिरडीच ।।५९।।

शिरडीच आम्हां बद्रिकेदार । शिरडीच नाशिक - त्र्यंबकेश्वर ।
शिरडीच उज्जयिनी महाकाळेश्वर । शिरडीच महाबळेश्वर गोकर्ण ।।६०।।

शिरडींत साईचा समागम । तोचि आम्हां आगम निगम ।
तोचि सकळ संसारोपशम । अत्यंत सुगम परमार्थ ।।६१।।

समर्थ साईंचें जें दर्शन । तेणेचि आम्हां योगसाधन ।
करितां तयांसी संभाषण । होय क्षालन पापाचें ।।६२।।

तयांचे जें चरणसंवाहन । तेंचि आम्हां त्रिवेणणीस्नान ।
तयांचे चरणतीर्थसेवन । तेंचिनिर्मूलन वासनांचें ।।६३।।

तयांचे जे आज्ञापण । तेंचि आम्हां वेदवचन ।
तयांच्या उदी - प्रसादाचें सेवन । पुण्यपावन सर्वार्थी ।।६४।।

साईचि आम्हां परब्रह्म । साईचि आमुचा परमार्थ परम ।
साईचि श्रीकृष्ण श्रीराम । निजाराम श्रीसाई ।।६५।।

साई स्वयें द्वंद्वातीत । कधी न उद्विग्न वा उल्लसित ।
सदैव निजस्वरूपीं स्थित । सदोदित सन्मात्र ।।६६।।

शिरडी केवळ केंद्रस्थान । क्षेत्र बाबांचे अति विस्तीर्ण ।
पंजाब कलकत्ता हिंदुस्थान । गुजराथ दख्खन कानडा ।।६७।।

शिरडीची साईची समाधि । तीचि अखिल संतांची मांदी ।
जेथील मार्ग क्रमितां प्रतिपदीं । तुटते ग्रंथी जीवाची ।।६८।।

सार्थक जन्मा आलियाचें । केवळ समाधिदर्शन साचें ।
मग सेवेसी जयांचें आयुष्य वेंचे । भाग्य तयांचे काय वानूं ।।६९।।

# श्री साईबाबांची लीलानगरी
# श्रीक्षेत्र शिरडी

★ विद्याधर ताठे ★

*भारतातील तीर्थक्षेत्रांमध्ये श्री तिरुपती बालाजी नंतरचे श्रीमंत देवस्थान म्हणून शिरडीचे श्री साईबाबा देवस्थान ओळखले जाते.पण ही श्रीमंती केवळ व्यवहारिक - भौतिक नव्हे तर शिरडी हे योग योगेश्वर साईबाबांच्या लीलाची भूमी आहे ही तिचे खरे वैभव आहे. श्री साईलीलाचे कार्यकारी संपादक विद्याधर ताठे यांनी करुन दिलेला शिर्डीचा थोडक्यात परिचय*

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. या भूमीत तीर्थ - क्षेत्रांची जशी अनेक स्थाने आहेत तशी अनेक संत क्षेत्रे पण आहेत. संत महात्म्यांच्या पावन वास्तव्याने पुनित झालेल्या क्षेत्रांमध्ये स्वामी स्वरुपानंदांचे पावस, अक्कलकोट स्वामी महाराजांचे अक्कलकोट, श्री गजानन महाराजांचे शेगाव, गोंदवलेकर महाराजांचे गोंदवले ही स्थाने आज भाविकभक्तांची श्रध्दास्थाने झाली असून श्री साईबाबांच्या लीलांनी पुनित झालेले श्रीक्षेत्र शिलधी उर्फ शिरडी आज केवळ महाराष्ट्रीयांचेच नव्हे तर देश-परदेशातील भक्तांचे श्रध्दास्थान झालेले आहे.

*जरी हे शरीर गेलो मी टाकून ।*
*तरी मी धावेन भक्तांसाठी ।*

हे श्री साईबाबांचे अभयवचन आजही लाखो भाविक अनुभवित असून **'शिरडीला मुंग्यांसारखे भक्त गोळा होतील'** ही स्वतः साईबाबांनी केलेली भविष्यवाणी आज पदोपदी क्षणोक्षणी शिरडीतील गर्दी पाहून प्रत्यंतरास येत आहे. तिरुपती नंतरचे भारतातील सर्वात श्रीमंत देवस्थान म्हणून आज शिरडीची सर्वत्र मान्यता असली तरी शिरडीचे खरे मोठेपण संस्थानची श्रीमंती व भक्तांची गर्दी हे नसून श्री साईबाबांचे प्रचितीस येणारे अस्तित्व हे होय ! **जेथे जातो तेथे तू माझा सांगाती । चालविसी हाती धरोनिया ।** असे साईबाबांचे भक्तवत्सल अस्तित्व प्रचितीस आलेले हजारो भक्त आहेत. त्यांच्या अनुभवाचे - त्यांच्या प्रचितीचे लेखन करायचे ठरले तर ग्रंथाचे शेकडो खंड अपुरे पडतील. बाबांची प्रचिती घेतलेल्या भक्तांमध्ये खेडूत - ग्रामीणवासी आहेत तसेच उच्च विद्याविभूषित सुध्दा आहेत. उच्चविद्याविभूषित विज्ञानवादी दृष्टीकोन असणाऱ्या भक्तांची बाबांवर श्रध्दा व निष्ठा लक्षात घेता शिरडीचे अगाध महात्म्य सहज पटण्यासारखे आहे. पण असे दुसऱ्याच्या अनुभवावर विश्वास ठेवण्यापेक्षा आपण स्वतःच शिरडीस जाऊन बाबांचे दर्शन घेऊ या व त्यांच्या अस्तित्वाची प्रचिती अनुभवुन पावन होऊ या. तर मग चला शिर्डीला !

शिर्डी ! अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यातील एक छोटेसे गाव, नगर-कोपरगाव हमरस्त्यावर असलेले, महाराष्ट्राची गंगा 'गोदावरी'च्या निकट वसलेले. पूर्वी गोदावरीत स्नान करूनच भाविक बाबांच्या दर्शनास येत. आता बसगाड्या थेट शिरडीत येत असल्यामुळे जवळपास गोदावरी नदी आहे हे अनेकांना ठाउकही नसते. नदीकाठीच तीर्थक्षेत्राचा वास असतो. बहुतेक क्षेत्र ही नदीकाठीच असतात. साऱ्या प्राचिन संस्कृत्या या नदीकाठीच फुललेल्या आहेत. गोदावरी व शिर्डी या दृष्टीने साईबाबासच्चरितातील पुढील ओवी लक्षात घेण्यासारखी आहे.

*तैसेचि हे योगेश्वर साई ।*
*महान शिरडीची पुण्याई ।*
*जगदुध्दाराचिये पायी ।*
*गोदे ठायी अवतरले ।। (१८।४)*

मुंबईहून नाशिकमार्गे थेट बसगाडीने किंवा मनमाडपर्यंत रेल्वेने व पुढे बसने शिरडीस येता येते. तसेच कोपरगाव, अहमदनगर, संगमनेर या मार्गेही बसने येता येते. आपण शिरडीच्या

बस स्थानकावर उतरून बाहेर पडताच आपणास श्री साईबाबा संस्थानचा स्वागत कक्ष दृष्टीस पडतो. तेथे निवास, भोजन व अन्य सर्व माहिती मिळते. त्यामुळे नाहक इकडे तिकडे हेलपाटे करण्यातला वेळ व श्रम वाचतात. काही धंदेवाईक लोक स्टँडवर उतरताच आपल्या मागे लागतात. पण अशा अनधिकृत धंदेवाईकांच्या नादी न लागता अधिकृत स्वागत कक्षातूनच सर्व मदत घ्यावी, म्हणजे मग पश्चाताप करण्याची-फसगत होण्याची पाळी येत नाही.

शिरडी संस्थानकडे भक्तांच्या निवासासाठी अनेक इमारती आहेत. सध्या संस्थानने खोल्या वाटप व्यवस्थेचे संगणिकीकरण असून उपलब्ध असलेल्या खोल्यांचे त्वरित वाटप होते व खोल्या रिकाम्या आहेत वा नाहीत हे कॉम्प्यूटरद्वारेच भक्तांना समजते. या सर्व खोल्या इतर हॉटेलच्या मानाने अत्यल्प दरात दिल्या जातात. शिवाय काही तास देवदर्शनापुरते शिरडीस थांबून पुढे रवाना होण्याच्या भक्तांसाठी संस्थानने तात्पूरते सामान ठेवण्यास लॉकरूम व सुलभ प्रसाधनालयांची सोय केलेली आहे. यामुळे अधिकाधिक भक्तांची सोय झालेली आहे. त्याचप्रमाणे भक्तांची अत्यल्प दरात भोजन प्रसादाचीही सोय केलेली आहे. इथे केवळ अडीच रुपयात नाश्ता तर केवळ चार रुपयात पोट भर जेवण दिले जाते. रोज हजारो भक्त या सेवेचा लाभ घेतात. संस्थानने उभी केलेली ही यंत्रणा खरोखरीच कौतुकास्पद आहे. अलिकडेच तेथे 'स्वरुची' पध्दतीची म्हणजे बुफे सिस्टीमचीही सोय करण्यात आलेली आहे. संस्थानने भक्तांना गरम पाणी मिळावे म्हणून सौरउर्जेचा (सोलर सिस्टीम) वापर केलेला आहे.

शिरडीतील देवदर्शनाची एक पारंपारिक पध्दती आहे. आज काल फारच थोडे भक्त ती पध्दत पाळतात. साईभक्त चांदोरकर, रा. भ. प्रधान यांनी ही पध्दत पाडली होती. ती अशी - गोदावरीचे सर्व प्रथम स्नान करणे नंतर बाबांच्या गुरुच्या समाधीचे दर्शन घेणे, त्यानंतर द्वारकामाईत जाऊन धुनीचे दर्शन, नंतर चावडीत जाऊन बाबांच्या पादुकांचे दर्शन आणि शेवटी साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेऊन लेंडीबागेतील नंदादीप, पिंपळ-निंबवृक्षाचे दर्शन घेणे अशी ही पध्दत अलिकडे भक्तांच्या प्रचंड गर्दीमुळे पाळली जात नाही. आता याच पारंपारिक क्रमाने आपण शिरडीतील स्थानांची दर्शने घेऊ.

**गुरुस्थान :** - हे स्थान सध्याच्या समाधी मंदीराच्या मागील बाजूस असून येथील लिंबाच्या वृक्षाखालीच सोळा वर्षाच्या तरुण योगाच्या रुपात श्री साईबाबांचे प्रथम प्रकटीकरण झाले. हे स्थान आपल्या गुरुंचे स्थान आहे असे साईंनी सर्व ग्रामस्थांना सांगितले. व तेथे दर-गुरुवारी-शुक्रवारी उद जाळण्यासही सांगीतले.

तैसेचि हे श्री साईनाथ ।
तरुण सोळा वर्षाचे वयात ।
निंबातळी शिरडी गावात ।
प्रथम भक्तार्थ प्रकटले ।।११।।



असा हेमाडपंतलिखित श्रीसाईसच्चरित्र ग्रंथातील ४थ्या अध्यायात उल्लेख असून नाना चोपदारांच्या आईने बाबांना प्रथम पाहिले असे म्हटलेले आहे.

*म्हणे हे माझ्या गुरुचे स्थान ।*
*अति पवित्र माझे वतन ।*
*आहे तैसेचि करा हे जतन ।*
*माना मद् वचन एवढे ।।१३१।।*

असे स्वतः साईबाबांनी ग्रामस्थांना विनविले तेव्हां त्या जागी आढळून आलेले भुयार ग्रामस्थांनी बुजवून बंद केले. अशा प्रकारे श्री साईबाबांच्या गुरुंचे स्थान म्हणून 'गुरुस्थान मंदीर व तेथील लिंबाचा वृक्ष' भाविक भक्तांचे प्रमुख श्रध्दास्थान आहे. १९४१ मध्ये या स्थानाचा जिर्णोद्धार करण्यात येऊन त्यानंतर सध्या जे मंदीर दिसते ते बांधण्यात आलेले आहे. या मंदिरातील श्री साईबाबांच्या फोटोपुढे एक शिवलींग व नंदी आहे. मंदीरापुढे धुप पात्र आहे. तेथे भाविक श्रध्देने धुप जाळतात व बाबांच्या

गुरुंचे वंदन करतात.

**द्वारकामाई :** - गुरुस्थानाचे वंदन करून तेथे धूप जाळून साईभक्त द्वारकामाईचे दर्शन करतात. द्वारकामाई हे स्थान साईबाबांच्या समग्र लिलांचे प्रमुख स्थान आहे. बाबांच्या जीवनातील सर्वाधिक काळ याच ठिकाणी गेला. येथेच त्यांनी नानासाहेब चांदोरकरांना गीतेतील श्लोक समजावून दिला. तर अब्दुल बाबांस कुराणातील आयताचा पाठ दिला. येथेच त्यांनी लक्ष्मीबाईंना देह ठेवण्यापूर्वी नऊ रुपये देऊन नवभक्तिचा उपदेश केला.

बाबांनी येथेच गहू दळून महामारी नष्ट करण्याची लिला केली. अवघ्या व्यापाऱ्यांनी दिव्यासाठी तेल देण्यास नकार दिल्यावर येथेच बाबांनी पणत्यांमधे पाणी घालून दिवे लावण्याचा चमत्कार केला. आणि या प्रसंगातून सामान्य ग्रामस्थांना साई अवताराचा प्रथम साक्षात्कार झाला.

बाबा प्रथम शिरडीत आले तेव्हा द्वारकामाई म्हणजे एक पडकी मशिद होती. बाबांच्या वास्तव्याने ती वास्तू पावन झाली. पुढे तिचा बाबांच्याच आज्ञेने नाना चांदोरकर, काका दिक्षीत आदिंनी जिर्णोद्धार केला.



या द्वारकामाईमध्ये बाबांच्या एवढ्या लिला झाल्या आहेत की त्या सर्व घटना-प्रसंग हा एक भल्या मोठ्या ग्रंथाचाच विषय आहे. 'श्रीसाईसच्चरित्र' ग्रंथातून भक्तांनी त्या वाचाव्यात.

या द्वारकामाईत बाबा ज्या शिळेवर बसत होते, त्या बाबांच्या पावन स्पर्शाने पुनित झालेल्या शिळेचे भाविक श्रध्देने वंदन करतात व सद्गतित होतात. येथेच बाबांनी पेटवलेली धुनी आहे, ती आज ही धगधगत असून त्यातील उदीने बाबांनी केलेले चमत्कार विलक्षण आहेत. आजही त्यातील उदीचा प्रभाव असंख्य भक्तांना प्रचितीस येतो. उदीच्या महिम्यावर हेमाडपंत यांनी श्रीसाईसच्चरित्र ग्रंथामध्ये खास अध्याय (३४ वा) लिहीलेला आहे.

*ऐशा या उदीच्या कथा अनेक ।*
*दिग्दर्शनार्थ कथीतो एक ।*
*श्रवण करीता वाटेल कौतुक ।*
*अनुभवपुर्वक म्हणोन ।।*

आजही उदीने आपण कसे संकट मुक्त झालो, चिंतामुक्त झालो ते सांगणारे - कथन करणारे अनेक भक्त आहेत. श्री साईबाबांच्या प्रचितीचा हे सर्व अनुभव हा ढळढळीत पुरावा आहे.

**चावडी :** - द्वारकामाईच्याजवळच श्रीसाईबाबांच्या वास्तव्याने मंगलधाम झालेली चावडी आहे. येथे एक दिवसा आडबाबा निवास करीत असत. मिरवणुकीने द्वारकामाईतून बाबांचे येथे एक दिवसाआड आगमन होई. येथेच बाबांची आरती केली जाई. या ठिकाणी सध्या बाबांचा एक फोटो असून एक पलंग बाबांच्या आठवणींना उजाळा देत आहे. या पलंगावरच बाबांना महानिर्वाणा नंतरचे स्नान घालण्यात आले होते.

**समाधी मंदीर :** - आज श्रीसाईबाबांची समाधी ज्या ठिकाणी आहे, त्यास समाधी मंदिर म्हटले जाते ही दगडी व देखणी इमारत बाबांच्याच अनुज्ञेने नागपूरचे श्रीमंत गोपाळराव उर्फ बापूसाहेब बुट्टी यांनी बांधली.

*नागपुरस्थ मोठे धनिक ।*
*बापूसाहेब बुट्टी नामक ।*
*तया हस्ते हे बाबांचे स्मारक ।*
*उभविले देख बाबांनी ।। (श्रीसास. ३९/१२४)*

'श्रीसाईसच्चरित्र' मधील वरील ओवी असलेला ३९ वा अध्याय समाधी मंदिर उर्फ बुट्टीवाड्याचा साद्यंत इतिहास सांगणारा आहे. या भव्य अशा वाड्यात एक गाभारा बांधून त्यामध्ये एका सुंदर सिंहासनावर मुरलीधराची मूर्ती स्थापन करावी अशी श्रीसाईबाबांच्याच अनुज्ञेने योजना ठरली होती. त्या दृष्टीने एका

कारागीरास मुरलीधराची सुंदर मूर्ती करण्यासाठी पाचारणही करण्यात आले होते. पण एवढ्यात बाबांची प्रकृती चिंताजनक झाली. आता एवढा प्रचंड खर्च करून बांधलेल्या वाड्यास बाबांचे पाय तरी लागणार का ? म्हणून बुट्टीसह सर्व चिंतेत पडले पण साईलिला काही वेगळीच होती.



समाधी मंदिरातील श्री साईनाथाची मूर्ती

*मजला वाड्यात दया ठेऊन ।*
*हे अंतकाळीचे बाबांचे वचन ।*
*निघता बाबांचिया मुखातून ।*
*जाहले निश्चित मन सर्वांचे ।।*

आणि अशा प्रकारे बुट्टी यांनी बांधलेला वाडा मुरलीधर मंदिर होण्याऐवजी श्रीसाईबाबांचे समाधी मंदिर झाला. या मंदिरात स्थापन करण्यासाठी तयार केलेली मुरलीधराची मूर्ती संस्थानने बबांची स्मृती म्हणून जपून ठेवलेली आहे.

वाडा झाला समाधी मंदिर
अगाध चरित्र साईंचे

यावरील स्थानाशिवाय **लेंडीबाग, नंदादीप, खंडोबा मंदिर, शामसुंदर समाधी** आदी अन्यही साईस्मृती स्थळे शिरडीत असून साई भक्तांची ती पवित्र क्षेत्रेच आहेत.

अशाप्रकारे शिरडी हे आजचे एक प्रमुख तीर्थक्षेत्र आहे. साईभक्तांच्या भक्तिभावांच्या दृष्टीने तर शिरडीहेच पंढरपूर-प्रयाग-काशी-जगन्नाथ-द्वारका आहे, साईच्या चरणी सकळ तीर्थे आहेत म्हणूनच साईसच्चरित्र ग्रंथात हेमाडपंत म्हणतात -

शिरडीच आम्हा पंढरपूर ।
शिरडच जगन्नाथ, द्वारकानगर ।
शिरडीच गया काशिविश्वेश्वर ।
रामेश्वरही शिरडीच ।। (४/५९)

तयाचे (साईंचे) जे चरण संवाहन ।
तेची आम्हा त्रिवेणी स्नान ।
तयाचे चरण तिर्थ सेवन ।
तेची निर्मूलन वासनांचे ।।

साईची आम्हा परब्रह्म ।
साईची आमुचा परमार्थ परम ।
साईची श्रीकृष्ण श्रीराम ।
निजाराम श्री साई ।।

❑ ❑ ❑

# दत्तात्रयांची तीर्थक्षेत्रे

- ग. के. कुलकर्णी

**महाराष्ट्र हे तीर्थक्षेत्रांचे माहेर आहे. पंढरपूर, आळंदी प्रमाणेच येथे श्री दत्तात्रयांची श्रीक्षेत्र गांणगापूर, श्रीक्षेत्र नृसिंहवाडी, श्रीक्षेत्र औदुंबर, श्रीक्षेत्र कारंजा, श्रीक्षेत्र माहुरगड आदी ठिकाणे प्रसिध्द आहेत. या दत्तगुरुंच्या तीर्थक्षेत्रांचा श्री गजानन कुलकर्णी यांनी करून दिलेला परिचय -**



श्रीपाद श्रीवल्लभ नृसिंह सरस्वती, वासुदेवानंद सरस्वती, श्री माणिक प्रभू, अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ, शिरडीचे श्री साईबाबा, शेगांवचे श्री गजानन महाराज, श्री नारायण महाराज केडगांवकर, श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीकर इत्यादि दत्तावतारी पुरुषांची भक्त परंपरा आजही फार मोठ्या प्रमाणावर वाढताना दिसत आहे त्याचे हेच कारण आहे. नृसिंहवाडी, औदुंबर, गाणगापूर, माहुर कारंजा ही दत्ताची कांही प्रमुख तीर्थक्षेत्र आहेत. इथे दत्तात्रेयचा नित्यवास असतो अशी भाविकांची नितांत श्रध्दा आहे. म्हणून आजही बारा महिने ही तीर्थक्षेत्र दत्तभक्तांनी नित्य गजबजलेली दिसतात. आज आपण या लेखात अशाच कांही तर्थस्थानांची माहिती करुन घेणार आहोत. चला तर मग प्रथम जाऊ या गाणगापूरी.

## ।। श्री क्षेत्र गाणगापूर ।।

श्री दत्तात्रेयांचा दुसरा अवतार श्री नृसिंह सरस्वतीची अनुष्ठान भूमि म्हणून प्रसिध्द असलेल्या गाणगापूराची या महाक्षेत्राची ओढ दत्तभक्तांना अतिशय आहे. हे दत्तक्षेत्र मध्यरेल्वेच्या मुंबई मद्रास मार्गावर मुंबई पासून ५०० किलोमिटर अंतरावर आहे. सोलापूर व गुलबर्गा या दोन स्टेशनांच्या मध्ये गाणगापूर रोड नावाचे एक स्टेशन आहे. तेथून क्षेत्र गाणगापूर सुमारे चौदा मैल अंतरावर आहे. भीमा अमरजा या नद्यांच्या संगमावर वसलेल्या या क्षेत्राचा उल्लेख पुराणातून 'गंधर्वपूर' म्हणून करण्यात आला आहे. या क्षेत्रात श्रीनृसिंहसरस्वती महाराज दोन तपापर्यंत निवास करून होते म्हणून दत्त सांप्रदायिकामध्ये या क्षेत्रात अतिशय महत्व आहे.

गाणगापूर येथील भक्तांना अत्यंत प्रियस्थान म्हणजे श्रीगुरुंचा मठ अथवा निर्गुण पादुका मंदीर हे होय. या मठाचे स्वरूप मंदिरासारखे नसून मोठ्या धाब्याच्या घरासारखे आहे. पूर्वेस व पश्चिमेस मठास महाद्वारे आहेत. पश्चिमद्वारावर नगारखाना आहे. मठाच्या पूर्वेस महादेव, दक्षिणेस औदुंबर, त्याखाली गणपती, महादेव व पार्वती यांच्या मूर्ती आहेत. पश्चिमेस अश्वत्थ वृक्ष आहे. या वृक्षाच्या भोवती नागनाथ, मारुती व तुळशी वृंदावन आहे. मठा भोवतीच्या ओवऱ्यात सेवेकरी व साधक अनुष्ठानास बसतात. मठाच्या दक्षिण भागात उत्तराभिमुख असा श्री गुरुपादुकांचा गाभारा असून त्याच्या समोर उत्तम फरशी केलेला सभामंडप आहे. गाभाऱ्याच्या उजव्या हाताला दरवाजा आहे. तेथून आत गेल्यावर गाभारा पश्चिमाभिमुख असल्याचे ध्यानात येते तेथेच एका कोनाड्यात चिंतामणिंची वालुकामय मूर्ती स्वतः नृसिंहसरस्वतींनी स्थापन केलेली आहे. या गणेशाच्या बाजूस पश्चिमाभिमुख अशा दारातून ओणवे होऊन प्रवेश करता येतो. लहानशा झरोक्यातून डोकावल्यावर पश्चिमाभिमुख अवस्थेत आसनस्थ अशा त्रिमूर्तीचे मनोहारी दर्शन घडते. या आसनावर गुरुंच्या पादुका ठेवलेल्या असून त्यांना "निर्गुणपादुका" अशी संज्ञा आहे. या पादुका शिळेवर कोरलेल्या नसून सुट्या आहेत. या निर्गुण पादुका चांदीच्या पत्र्याने मढविलेल्या पेटीत बंद करून ठेवलेल्या असतात. कोणासही त्याना स्पर्शकरता येत नाही. श्री गुरुंच्या पूजेतील बाण, दहा शाळीग्रम, तीन स्फटीकांची लिंग यांचाही निवास तेथे आहे. निर्गुण पादुकांत दत्तात्रेयांचे वास्तव्य असते. अनेकांना यासंबंधी साक्षात्कार झालेला आहे. श्रीगुरु देहातीत, गुण रुपातीत होऊन निर्गुण स्वरुप बनले म्हणून या पादुकांना "निर्गुण पादुका" असे नांव मिळाले आहे.

गाणगापुरच्या नैऋत्य दिशेला दीड मैलावर भीमा व अमरजा यांचे संगमस्थान आहे, भागीरथी कुंडापासून दोन फर्लांगावर श्रीगुरुंचे

विश्रांतीस्थान आहे. शुद्र भक्त पर्वतेश्वर याच्या शेतात हे स्थान असून या शुद्र शेतकऱ्याची कथा गुरुचरित्राच्या ४७ व्या अध्यायात आलेली आहे. संगमाजवळच भस्माचा डोंगर आहे. श्रीगुरुंच्या अनुष्ठान स्थानाच्या पुर्वेस उत्तरवाहिनी भीमा व दक्षिणेस पूर्ववाहिनी अमरजा या दोन नद्यांचा संगम आग्नेय दिशेस झालेला आहे. पश्चिमेस अनादी संगमेश्वराचे देवालय आहे. श्रीगुरुंच्या अनुष्ठान स्थानावर बाळासाहेब रास्ते यांनी एक मंदिर बांधून येथील अश्वत्थ वृक्षाखाली पादुकांची स्थापना केली आहे. भीमा तीरावर नरहरी ब्राम्हणास कुष्ठरोग परिहारासाठी औदुंबराचे शुष्ककाष्ठ पल्लवित होई पर्यंत सेवा करण्याची आज्ञा श्री गुरुंनी त्याला केली होती. तो औदुंबर वृक्ष आज येथे नसला तरी तेथील पादुका अश्वत्थ वृक्षाखाली स्थापन झाल्या आहेत.

पादुका मंदीर व संगम याखेरीज यात्रेकरूंना भक्तांना, सर्व तीर्थक्षेत्राचे पुण्य प्राप्तकरुन देणारी आणखी आठ महत्त्वाची तीर्थे येथे आहेत. १) प्रत्यक्ष संगमात असलेल्या षट्कुळतीर्थाचा महिमा प्रयागा सारखा आहे. २) नृसिंह उर्फ मनोहर तीर्थ संगमावरील मंदिरा समोर असून तेथे स्नान करुन संगमेश्वराची पूजा केल्यास, श्री. शैल्यमल्लिकार्जूनाची पूजा केल्याचे पुण्य पदरात पडते. ३) भागरिथी उर्फ वाणारसी तीर्थात स्नान केल्याने काशीच्या मणिकर्णिकेत स्नान केल्याचे पुण्य लाभते. ४) पापविनाशी तार्थात स्नान केल्यास मनुष्य सर्व पापापासून मुक्त होतो. श्री गुरुंची बहीण रत्नाबाई हिला कुष्ठरोग झाला होता. या तीर्थात स्नान केल्याने ती मुक्त झाल्याची कथा गुरुचरित्रात आहे. ५) कोटीतीर्थात स्नान केल्यास सर्व तीर्थात स्नान केल्याचे पुण्य मिळते. ६) रुद्रपादतीर्थात स्नान केल्याने गया तीर्थात स्नान केल्याचे पुण्य मिळते. ७) चक्रतीर्थात स्नान करुन तेथील केशव देवाची पूजा केल्यावर द्वारकेच्या यात्रेचे पुण्य पदरी पडते. ८) आठवे तीर्थ गावाच्या पूर्वेस दोन फर्लांगावर श्रीकल्लेश्वराच्या मंदिरासमोर मन्मथ तीर्थ या नावाने प्रसिध्द असून येथे स्नान करून श्री कल्लेश्वराची पूजा केल्यास गोकर्णमहाबळेश्वरची पूजा केल्याचे श्रेय मिळते.

गाणगापूरच्या पूर्वेच्या दोन मैलावर कल्लेश्वर नावाचे एक शिवस्थान आहे. उत्तरेस तंतुकेश्वराचे स्थान आहे. नरहरीकविश्वराचा कल्लेश्वराशी व तंतिकाचा तंतुकेश्वराशी असलेला संबंध गुरुचरित्रात स्पष्टपणे वर्णन केला आहे. अलिकडच्या काळात श्रीसच्चिदानंद सरस्वती उर्फ इटगा स्वामी यांनी गाणगापूराजवळ इटगापूरी येथे समाधी घेतली होती. त्यांची धर्मशाळा गाणगापूरातच आहे. अनेक दत्तभक्तांना येथे सात्काक्षार झाला आहे. अनेकांच्या दुर्धर व्याधी येथे राहून आणि अनुष्ठान करुन दूर झाल्या आहेत. आजही दत्तभक्तांना असा अनुभव नित्ययेत आहे. असे हे श्री दत्तगुरुचे महान तीर्थक्षेत्र आहे.

गाणगापूराचा महीमा जाणून तर घेतला आता जायचय आपल्याला श्री गुरुंच्या पदस्पर्शाने वास्तवाने पूनित झालेल्या महाराष्ट्रातील आणखी एक महान तीर्थक्षेत्र नृसिहवाडीला.

## ।। श्रीक्षेत्र नृसिंहवाडी ।।

नृसिंहवाडी हे स्थान कृष्णा पंचगंगेच्या संगमावर असून निसर्ग रमणीय आहे. यांची परमपवित्रता प्रसिध्द आहे. या ठिकाणी श्रीनृसिंहसरस्वती दत्त महाराज येणार आहेत हे पूर्वीच योग सामर्थ्याने जाणून श्रीरामचंद्र योगी प्रभुती सत्पुरुषांनी या स्थानामध्ये येऊन तप करण्यास सुरुवात केली होती. अशा या रमणीय व परमपवित्र स्थाना मध्ये महाराजानी वास्तव्य करुन त्यांनीही हे स्थान आपली तपोभूमी बनविले. या ठिकाणी १२ वर्षे श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराजानी तप केले. त्यामुळे हे स्थान सिध्द क्षेत्र म्हणून प्रसिध्दीस आले.

येथे कृष्णेच्या प्रवाहामध्ये शुक्ल पापविनाशी, काम्य, सिध्द, अमर, कोटिशक्ती आणि प्रयाग अशी प्रधान अष्टतीर्थे आहेत. त्यांचा महिमा फार मोठा आहे. कृष्णेचा महिमा 'कृष्णा विष्णु **तनुः साक्षात्**' अशा वचनाने वेदव्यासाने प्रगट केला आहे. साक्षात् विष्णूचे शरीररुप असलेली कृष्णा आणि शिवा, भद्रा, भोगावती, कुंभी व सरस्वती मिळून पंचगंगा अशा दोन पुण्यनद्यांचा येथे संगम आहे. हा संगम सर्वसंगम मध्ये श्रेष्ठ आहे. येथे औदुंबर वृक्षाखाली श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराजांनी वास्तव्य केले म्हणूनच

**"औदुंबरः कल्पवृक्षः कामधेनुश्च संगमः ।**
**चिंतामणी गरोः पादौ दुर्लभौ भुवनत्रये ।।**

अशी यास्थानाची अपूर्वमहतिगायली गेली आहे. येथे पूर्वेस अमरेश्वरी देवतांचे वास्तव्य पश्चिमेस श्रीरामचंद्र स्वामी प्रभृती योगीजनांचे वास्तव्य, याप्रमाणे येथे दिव्यतेची सिध्दता आहे. या स्थानावर श्रीनृसिंहसरस्वती महाराज यांचे पूर्ण प्रेम आहे. येथेच कायम रहावे अशी त्यांची इच्छा होती, पण भक्तजणांच्या उद्धारा करता प्रकट रुपाने गाणगापूरास जावे म्हणून गाणगापूरास जाण्यास महाराज तयार झाले. हे वृत्त येथील योगींना समजले तेव्हा त्यांनी आम्हांस सोडून आपण जाऊ नये, येथेच रहावे, अशी कळकळीची प्रार्थना केली. त्यांना महाराजानी आपले हृदगत सांगताना म्हटले.

हे स्थान प्रसिध्द होईल अखिल लोक याचे पूजन करतील. त्यांचे सर्व मनोरथ पूर्ण होतील. तुम्ही त्यांना सहाय्य करा. मी येथेच आहे. माझ्या मनोहर पादुका येथ मी स्थापन करतो. त्या पादुकांचे तुमचे व औदुंबराचे पूजन जे करतील त्यांच्या सर्व कामना पूर्ण होतील' असा वर त्यांनी योगीनीना दिला. त्याप्रमाणे येथे पादुका स्थापन केल्या व त्यांची निरंतर पूजा चालावी अशी व्यवस्था महाराजानी स्वतः केली. सर्व विश्रुत महामहिमशाली महात्मे श्रीनारायणस्वामी, गोविंदस्वामी, गोपाळस्वामी, मौनीस्वामी, ब्रम्हानंदस्वामी, टेंबेस्वामी प्रभृती सर्व संगपरित्याग करुन या

ठिकाणी रममाण झाले व येथेच राहीले. त्यांचे पूजनही येथे नित्य होत आहे, असे या स्थानाचे विशेष महत्त्व आहे.

श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराज यापुण्यमय तपोभूमीमध्ये वास्तव्य करीत असताना या सिद्धस्थानामध्ये आपले स्वरुप स्थापन करावे व त्याद्वारा असंख्य भक्तजणांचे कल्याण व्हावे असे त्यांच्या मनात आले. भगवान सत्य संकल्प असल्यामुळे तेथे विलंब कशाचा ? त्याच वेळी आळास येथील षटकर्म निरत सदाचार संपन्न ब्राम्हण म्हणजे आजच्या पुजाऱ्यांचे पूर्वज वेदशास्त्र संपन्न बहिरंभट हे दर्शनास आले. ते शिरोळास वृत्तीकरता जात येत असत त्यावेळी जाता येता श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराजांना नमस्कार करुन जाण्याचा त्यांचा क्रम होता. बरेच दिवस हा क्रम सुरु होता या प्रमाणे वे.शा. सं. बहिरंभट आले असता श्रीमहाराजानी आपली इच्छा त्यांना सांगितली. आम्ही येथे आमच्या मनोहर पादुका स्थापन करतो आणि आपण त्याचे अर्चन करावे. या पासून आपले व जगाचे कल्याण होणार आहे असे सांगितले.

त्यावेळी बहिरंभटजींना होय किंवा नाही काहीच उत्तर देता येईना. कारण होय म्हणावे तर आपले वय ८० वर्षाचे, आपल्या कुटुंबाचे वय ६० वर्षाचे याशिवाय आपणास मुलबाळ नाही, अशा परिस्थितीत हे अर्चनाचे कार्य व तेही अख्यांत तेव्हा न स्विकारणे बरे असे त्यास वाटले, परंतु श्री महाराजांचे तेजस्वी स्वरुप पाहून व प्रभाव पाहून आणि त्यांच्या मुखातून निघालेले कल्याणचे उद्‌गार ऐकून त्यांना नाही असे एकदम म्हणवेना. शेवटी आपल्या कुटुंबांची संमती घेऊन काय ते चरणी निवदेन करतो असे त्यांनी सांगितले या गोष्टीस महाराजांनीही संमती दिली पण त्यादिवशी रात्री श्री महाराजांनी आपल्या सान्निध त्यांना ठेऊन घेतले. उद्या सकाळी आपण जावे अशी आज्ञा त्यांना झाली; त्याप्रमाणे ते राहिले. पण त्यांच्या भार्येस रोजच्या क्रमाप्रमाणे पती घरी न आल्यामुळे विशेष चिंता लागून राहिली. तिने त्या वेळी आपली कुलदेवता जी एकवीरा तिची अनन्य भआवाने प्रार्थना केली. नंतर ती निजली असता देवीने स्वप्नात येऊन तुझा पती श्रीनृसिंहसरस्वती स्वामीला राजा जवळ सुखरुप आहे, काही चिंता करु नको असे सांगितले. थोड्यावेळात संगमावर श्री नृसिंहसरस्वती महाराजांचे सान्निध आपला पती असल्याचे तिला दिसले.

दुसऱ्यादिवशी सकाळी पतीराज गृही आहे. रोजच्या क्रमाप्रमाणे पूजा वगैरे होऊन वैश्वदेव झाला. त्याच वेळी अतिथी म्हणून एक योगी पुरुष त्यांचे घरी आले. त्यांचे आदरातिथ्य त्यांनी केले. भोजन झाल्यावर योगी महाराजांनी थोडी विश्रांती घेतली. त्यावेळी काल रात्री घरीन येण्याचे कारण शास्त्रीबुवाना त्यांच्या पत्नीने विचारले. शास्त्रीबुवानी घडलेला सर्ववृत्तांत पत्नीला सांगितला आणि आता काय करावे असा तिला प्रश्न केला. पत्नीचा प्रश्न ऐकून साध्वी स्त्री तात्काळ म्हणाली आज सुंदर योग आहे पहा अनायसे आपल्या घरी योगी महाराज अतिथी म्हणून आले आहेत तेव्हा त्यांचा सल्ला घेऊन ते म्हणतील तसे करावे असे मला वाटते. पत्नीच्या उत्तराने शास्त्रीबुवांचे चित्त शांत झाले. थोड्यावेळाने योगीराज विश्रांती घेऊन उठल्यावर बुवानी त्यांना प्रश्न केला. त्यावर उत्तर देताना योगीराज म्हणाले श्रीनृसिंहसरस्वती महाराज दत्तावतार आहेत. त्यांची आज्ञा आपण शिरसावंद्य मानावी त्यातच आपले खरे कल्याण आहे. इतके सांगून योगीराज निघून गेले. दुसऱ्या दिवशी पतिपत्नी दोघेही श्रीदत्तगुरुंच्या दर्शनास आले.

त्यांना पाहताच गुरुमहाराजांनी पूर्वीचाच प्रश्न केला. आपण यास्थानाचे अर्चन केल्यास आपले कल्याण होणार आहे. तेव्हा आपले काय ठरले ते सांगा महाराजाचा प्रश्न ऐकूनही ते स्थान अख्यात असल्यामुळे शास्त्री बुवांच्या तोडून होय नाही असे काहीच उत्तर येईना. त्यावेळी परमकृपाळू श्रीमहाराजानी आपलेदिव्य असे त्रिमूर्तीस्वरुप त्यांना दाखविले त्याबरोबर मात्र त्याची विलक्षण श्रध्दा श्री महाराजावर बसली आणि महाराजांच्या म्हणण्याप्रमाणे अर्चनेचे काम त्यांनी मोठ्या आनंदाने स्विकारले. तिथे महाराजानी आपल्या मनोहर पादुकांची स्थापना केली महाराजांच्या समक्ष बहिरंभटानी त्या पादुकांची मनोभावे पूजा केली. त्यांची भक्ती पाहून श्रीगुरुंना समाधान झाले. त्यांनी पूजेचे सर्वनियम बहिरंभटाना समजावून सांगितले, आणि आपणास एक मुलगा होईल व त्यास चार मुलगे होतील व त्यांचा वंशया औदुंबर वृक्षाच्या फळाप्रमाणे विस्तार पावेल असा आशिर्वाद दिला. आपणास संतती झाल्यावर येथे राहून पूजा करावी तोपर्यंत आपण आपल्या गावात रहावे व पूजेच्या वेळी येथे राहून पूजा करावी; असे सांगितले. थोड्याच दिवसात महाराजांच्या आशिर्वादाप्रमाणे बहिरंभटास मुलगा झाला. त्याचे नाव त्यांनी महाराजाचे अनुज्ञेने श्रीपाद असे ठवले. त्यानंतर काहीकाळानंतर महाराज गाणगापूरास निघून गेले. पुढे महाराजांचे आशिर्वादाप्रमाणे श्रीपादास चार पूत्र झाले. महाराजांचे आज्ञेप्रमाणे ते कुटुंब येथे येऊन राहिले व नियमाने मंत्रपूर्वक, भक्तिपूर्वक पूजन करण्याचा कार्यक्रम त्याने सुरु केला. त्यामुळे भगवान प्रसन्न झाले आणि या स्थानाचे महत्त्व सर्वत्र वाढत गेले. त्या चार पूत्राचा वंश म्हणजे हल्लीच्या पुजाऱ्यांचे चारफड होत. त्यांच्याकडून पूजेचा क्रम अव्याहत चालू आहे. प्रत्येक शनिवारी पंचक्रोशीतील भक्त येथे दर्शनास येतात. त्याहीपेक्षा अधिक लोक प्रत्येक पौर्णिमेस येऊन पूजा पालखी वगैरे पाहून संतुष्ट होतात. आजही श्रींच्या पूजनादिकांनी आपले मनोरथ पूर्ण करून घेतात असे हे महा जागृत दत्तस्थान आहे.

## ।। श्री क्षेत्र औंदुबर ।।

तिसरे महत्त्वाचे दत्तस्थान म्हणजे औंदुबर. औंदुबर हे एक प्रसिध्द दत्तक्षेत्र असून ते मिरजच्या अलीकडील भिलवडी स्टेशन पासून चार मैल अंतरावर आहे. श्रीनृसिंहसरस्वती स्वामीमहाराजाचे या स्थानात दिर्घकाळ वास्तव्य होते. श्री स्वामीचे हे तपश्चर्या स्थान आहे. श्री स्वामींचे वैराग्य आणि विद्वता पाहून

अनेक साधुसंन्यासी साधक त्यांच्याकडे येत व त्यांच्या सहवासाने, सदुपदेशाने कृतार्थ होत श्रीनृसिंहसरस्वतीनी भारतातील सर्व यात्रा केल्या. अनेकांचा उध्दार केला. पुढे त्यांनी तपश्चर्येसाठी निवडली ती तीन स्थाने औदुंबर, नरसिंहवाडी, आणि गाणगापुर औदुंबरी प्रशांत कृष्णा प्रवाहात असलेले सिध्दस्थान पैलतीरी श्रीभुवनेश्वरीचे वास्तव्य आणि औदुंबरवृक्षाची राई, यामुळे श्रीगुरुंचे प्रथम आगमन येथे झाले. कृष्णाकाठी औदुंबरवृक्षाच्या घनघाट छायेत श्रीगुरुंनी गुप्तपणे वास्तव्य केले. पण कस्तुरीचा सौरभ लपून थोडाच राहणार ! श्री गुरुंचा गुप्तवास प्रगट केला भिलवडीच्या भुवनेश्वरीने.

हे गाव म्हणजे औदुंबराचे स्थान अंकलखोप गावाखाली वसलेले आहे. अंकलखोपची जोशी मंडळी दररोज येथे येऊन श्रीगुरुपादुकांची पूजा करीत असत नंतरही मंडळी गुरुपादुका सन्निधच राहून पूजा अर्चा करु लागली. हीच येथील पुजारी मंडळी. येथल्या श्रीगुरुपादुकांची उपासना-सेवा या योगे हजारो भाविक दुःख मुक्त होत आहेत.

अशा या पावनस्थळी साधुसंत आले नाहीत तरच नवल. संतकाळी श्री जनार्दन स्वामी व एकनाथ महाराज हे या ठिकाणी येऊन गेले. त्यांना श्रीगुरुंनी येथे प्रत्यक्ष दर्शन दीले.

इ. स. १८२६ च्या सुमारास गिरनार पर्वतावरुन महान तपस्वी ब्रह्मानंद स्वामी औदुंबरी आले होते. त्यांनी येथे तपश्चर्य केली. त्यांचा मठ व समाधी येथे आहे. त्यांची शिष्य परंपराही येथे असून सध्या मठाधिकारी म्हणून पूर्णनंद महाराज येथे असतात.

सन १९५२ साली कर्नाटकातील एक अग्निहोत्री साधक येथे आले. त्यांनी औदुंबरीच संन्यास दिक्षा घेतली आणि नारायणतीर्थ असे नाव धारण केले. तिन्ही त्रिकाळस्नान जप, योगसाधना असा त्याचा काळ-जाई, औदुंबरी त्यांच्या तपश्चर्येसाठी त्यांच्या भक्तमंडळींनी एक मठ उभारलेला आहे. महाराजांना योगसाधनेसाठी गुहाही बनविली आहे.

त्यांचे गुरु शिवानंदयती यांच्या पादुकांची ते नित्य पूजा करीत असत. सन १९६७ च्या दत्तजयंतीस भक्तमंडळीकडून मठाच्या आवारातच मंदीर बांधवून तेथे गुरुपादुकांची स्थापना त्यानी करविली आणि पुढे दोनच महीन्यांनी माघवद्य प्रतिपदेस श्रीनरसिंहसरस्वतीच्या निर्याण दिनी श्रीनारायणतीर्थस्वामींनी तेथे महानिर्वाण केले. समाधी घेतली मठात गुरुपादुकांच्या समोरच नारायण महाराजाचीही समाधी आता बांधली आहे. महाराजांचे आज्ञेवरुन या मठास त्यांचे मोक्षगुरु शिवानंद आणि संन्यास दिक्षागुरु श्री शंकरानंद यांचे नाव म्हणजे श्रीशिवशंकरानंद आश्रम असे नाव मठास दिले आहे. श्रीनारायणतीर्थस्वामीच्यामुळे अशारितीने या स्थानास पुन्हा महत्त्व आले. श्री दत्तगुरुंची अशी ही तीन प्रख्यात तीर्थ स्थाने आहेत. ह्या ठिकाणी श्रीदत्त गुरुंचा सदा सर्वकाळ वास आहे. म्हणून माझ्या प्रिय दत्तभक्तांनो एकदातरी या तिर्थक्षेत्राची अवश्य वारी करा.

## ।। श्रीक्षेत्र कारंजा ।।

श्रीदत्तात्रयांचा दुसरा अवतार म्हणून प्रसिध्द असलेल्या श्रीनृसिंहसरस्वती महाराजांचे हे अत्यंत पवित्र असे जन्मस्थान म्हणून करंजनगरीवा कारंजा या शहराची प्रसिध्दी आहे. श्रीवासूदेवानंद सरस्वती आणि श्री ब्रम्हानंद सरस्वती यांच्या प्रयत्नाने श्रीगुरुंच्या या जन्म स्थानाची महती सर्व दत्तभक्तांना पटलेली दिसते विदर्भातील अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर-यवतमाळ या रेल्वेरस्त्यावर कारंजा हे स्टेशन आहे. तीसपस्तीस हजारावर वस्ती असलेल्या या गावी चांगली बाजारपेठ असून श्री गुरमंदिरामुळे दत्ताभक्तांना हे स्थान अत्यंत प्रिय आहे.

याक्षेत्राचे महत्त्व फार प्राचीन काळापासून वर्णन केले गेले आहे. करंजमुनींनी या ठिकाणी पाण्यासाठी तलाव खणण्यास सुरुवात केल्याची कथा आहे. याक्षेत्रातगंगा व यमुना यांचे वास्तव्य बिंदुमती नावाच्या कुंडात असून येथून पुढे बेंबळा नदी वाहते. याच क्षेत्रात यक्षमाता यक्षिणी देवीचेही वास्तव्य असल्याचे सांगतात. करंजमुनींच्या प्रभावाने गरडापासून शेषनागास येथेच संरक्षण मिळाल्यामुळे या क्षेत्रास 'शेषांकित क्षेत्र' असेही नाव आहे. येथील नागेश्वराच्या पूजनामुळे कधीही विषबाधा होत नाही असे संगतात.

याच कारंज नगरीत श्रीनृसिंहसरस्वती शके १३०० च्या सुमारास जन्मास आले. श्री गुरुंच्या जन्मस्थानाचा शोध अलीकडेच लागला. सन १९०५ मध्ये वासुदेवानंद सरस्वतींनी या नगरीत श्रीराममंदिरात वास्तव्य केले होते. सध्याच्या गुरुमंदिरा शेजारी घुडे यांचा वाडा आहे. बाळकृष्ण श्रीधर घुडे यांनी नगरनाईक काळे यांच्याकडून हा वाडा सन १८८० च्या सुमारास विकत घेतला. काळे यांचे वंशज सध्या काशीस असतात. यापैकी कोणालाच श्री गुरुंच्या जन्मस्थानाची माहिती नव्हती. हा वाडा चार मजली भव्य व प्रेक्षणीय आहे. जमिनीखाली तीन मजली भुयार आहे. भिंतीची रुंदी चार फुटा पासून सहा फुटापर्यंत आहे. दुसऱ्या मजल्यावर श्रीगुरुंच्या जन्मस्थानाची जागा आहे. या वाड्याच्या शेजारच्या जून्या माडीवर एक रात्र राहण्याच्या योग आला असता श्री वासुदेवानंदाना श्रीगुरुंच्या वास्तव्याचा अंदाज आला. बापूसाहेब घुडे यांच्या वाड्यातील भिंतीत एक नृसिंहस्थान असून तेथे संन्यासी वेषातल्या व्यक्तीचा अदृश्य निवास असल्याचे त्यांच्या कानी आले. काही जणानां या यतीचे दर्शन झाले होते. "माझे वास्तव्य येथेच आहे "असा दृष्टांतही त्यांना झाला. अण्णासाहेब पटवर्धन यांनीही या कामी लक्ष घातले.

सन १९२०-२१ मध्ये श्री लीलादत्त उर्फ ब्रम्हीभूत ब्रम्हानंद सरस्वती यांनाही या स्थानाची ओढ लागून तेथे गुरुमंदीर उभारावे अशी प्रेरणा झाली. त्यांना तेथे स्थापन करण्यासाठी निर्गुण पादुकाही मिळाल्या. श्री गुरुंचे मंदिर, त्यांची मूर्ती, त्यांच्या पादुका याची सिध्दता होऊन सन १९३४ च्या सुमारास आणखी एका जून्या दत्तक्षेत्राची नव्याने निर्मिती झाली. श्री दीक्षित स्वामीनींही या

कामी बरेच लक्ष घातले. दत्तात्रेय, चिंतामणी गणपती, काशीविश्वेवर, श्री गुरुपादुका इत्यादींच्या दर्शनाची सोय झाली. गुरुमंदिरातील मूर्ती अतिशय रम्य व बालसंन्यासी रुपातली आहे. येथेही श्रीनृसंहसरस्वतींचा वा दत्तात्रेयांचा साक्षात्कार अनेक साधकाना झाला आहे. आजही होत आहे.

श्रीगुरुंच्या मंदिरापासून जवळच कामाक्षी व एकवीरा यांची मंदिरे आहेत. गावाच्या दक्षिणेस एक मैलाच्या परिसरात ऋषितलाव असून कमलांनी व ऑस्ट्रेलियन पनकोंबड्यांनी ती शोभिवंत दिसतो. कामाक्षी देवीच्या कृपाप्रसादामुळे करंज ऋषींनी या तलावाची निर्मिती केल्यची कथा 'करंज महात्म्य' नावाच्या प्राकृत ग्रंथात आहे. याच ठिकाणी बेंबळा नदीचा उगम दत्त मंदिराजवळ आहे. गरुड एकदा गंगा व यमुना यांना स्वर्गातून घेऊन येत असताना त्यातला एक बिंदू येथे पडला, त्या जागेस बिंदु तीर्थ असे नाव असून तेथूनच बिंदुमती अथवा बेंबळा नदी प्रवाहित होते. या तीर्थापासून जवळच बालसमुद्र अथवा चंद्रतलाव आहे. चंद्राने गुरु पत्नीशी व्यभिचार केल्याने त्याच्या अंगाचा दाह होत राहिला. त्याने तपाचरण करून आपल्या अंगाचा दाह शमविला, त्यास चंद्रतलाव असे नाव मिळाले. याच्या काठावरील महादेवास चंद्रेश्वर म्हणतात.

श्री गुरुंच्या जन्मस्थानाला लागूनच रोकठा रामाचा मठ आहे. बाळकाराम नावाच्या एका माणसाने श्रीगुरुंची मनोभावे सेवा केली. त्याची पत्नी साळुंकाबाई ही सुध्दा भाविक होती. तीने मारुतीची सेवा केली. तिला मारुतीच्या कृपेने पूत्र झाला. त्या मुलाचा चेहर मारूती प्रमाणे असून त्याला लहानसे शेपूटही होते. या मुलाचे नाव रोकडा मारूती. याने आपल्या हाताने लिहीलेला दासबोध या मठात आहे. श्री गुरुंच्या स्थानापासून उत्तरेस सिध्देश्वराचे देऊळ आहे. त्याला लागून प्रभूस्वामींचा मठ आहे. औरंगजेबाचे सरदाराने आपल्या स्वारीत करंजनगरीच्या प्रभूस्वामीस त्रास दिला. तेव्हां त्याच्या अंगाचा दाह झाला. त्याने महाराजांची क्षमा मागून मंदिर बांधून दिले. तोच हा प्रभूस्वामींचा मठ होय. कारंज नगरीची श्रीमंती दर्शविणाऱ्या एका ऐतीहासीक कथेची साक्ष देणारी कस्तूरीची हवेली असे हे दत्तस्थान लाडाचे कारंजा म्हणूनही प्रसिध्द आहे.

## ।। श्रीक्षेत्र माहूरगड ।।

श्रीदत्ताचे विश्रांती स्थान म्हणून प्रसिध्द असलेले माहूर गडावरील दत्ताचे स्थान दत्तभक्तामध्ये फार प्रसिध्द आहे. माहूर गडावर जायची ओढ प्रत्येक दत्तभक्ताला लागून राहीलेली असते. मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यात किनवट नावाचा तालुका आहे तेथील माहूर गडावर हे स्थान आहे. येथे श्रीदत्तात्रेय, माता अनुसूया आणी देवी रेणुका महात्म्य आणी कालिकाखंडात आमली (माहूर) महात्म्य अशा दोन कथा आल्या आहेत. ब्रम्हदेवास सृष्टीची रचना करण्यास सोईचे व्हावे म्हणून श्री विष्णूनी सृष्टीरचनेचा नमुना म्हणून ह्या क्षेत्राची रचना करून दाखविली असे म्हणतात. हे क्षेत्र सात कोस लांब व सात कोस रुंद अशा विस्तृत प्रमाणावर निर्माण झालेले असून या क्षेत्राला चार दरवाजे आहेत. पूर्वेकडे हाटकेश्वर असून येथे बंजारा नदीवर धबधबा आहे. दक्षिणेस बनगंगेच्या काठी फुलसावंगी गावाजवळ एका टेकडीवर विमलेश्वराचे स्थान आहे. पश्चिमेस इझनी गावा जवळच्या पहाडात दर्दरेश्व आहे. तर उत्तरेकडे सिध्देश्व व कावेश्वर अशी स्थाने आहेत.

माहूर अथवा मातापूर या क्षेत्रांच्या तीनही बाजूंनी पैनगंगा नदी वाहते. नदी ओलांडून गेल्यावर दोन चार मैलावर पहाडाच्या पायथ्याशी माहूर क्षेत्र आहे. रेणूका माता, दत्तात्रय व अनूसया यांची शिखरे गावाच्या पार्श्वभूमिस लागून स्वतंत्र पणे आहेत. पैनगंगा नदीसही पौराणिक पार्श्वभूमी आहे. विदर्भातील लोणाक्षेत्री लवणासुरास विष्णुनी मारले म्हणून ब्रम्हदेवाने श्रीविष्णुच पाय आपल्या कमंडलूतील पाण्यानी धुतले. ते पाणी या नदीच्या पात्रात मिसळल्यामुळे भगवंताच्या चरण तिर्थाने पावन झालेली ती पैनगंगा म्हणून प्रसिध्द पावली. हीलाच पुढे प्रणिता अथवा प्रणहित अशी नावे मिळालेली दिसतात. 'प्रणिता प्रदक्षिणा वाहते । दुने वैकुंठ महिवरते । असा या क्षेत्राचा महिमा विष्णुदासांनी लिहून टेविला आहे. आमलीग्राम, सिंहपूर, देवनगर, मातापूर अशी वइविध नावे निरनिराळ्या युगात या क्षेत्रास मिळालेली दिसतात. काशी क्षेत्रापक्षाही या क्षेत्राचे महात्म्य मोठे आहे. म्हणून 'जेव्हां आगळी काशी' असे या क्षेत्रास संबोधिले जाते. काशी क्षेत्रास जसा काळ भैरव तसा या क्षेत्रास झंपटनाथ हा क्षेत्रपाल कोतवाल आहे.

या माहूर क्षेत्रात जगदंबा, रेणुका, दत्तात्रय व देवदेवेश्वर या प्मुख देवतांचा वास असल्याने सर्वच भाविकांना या स्थानाची नित्य ओढ लागून राहिलेली असते. जमदग्नी रेणूका, परशुराम यांची स्थाने येथेच आहे. जमदग्नी चितेवर रेणूका सती गेली ती येथेच. दत्तात्रय त्यावेळी उपस्थित होते. चितेतून गळयपर्यंतच निघालेली रेणूका आज येथील रम्य शिखरावर निवास करून आहे. शिखराच्या पायथ्याशी मोवाळा नावाचा एक तलार असून त्याला मातृतिर्थ म्हणतात. या तिर्थात स्नान केल्याने सर्व पातकांचा नाश होतो. रेणूका शिकरापासून तीन मैलावर दत्तात्रयांचे शिखर आहे. हे संस्थान गोसावी महंताच्या ताब्यात होते. तूर्त येथील व्यवस्था सरकार पाहते. येथील मंदिरात दत्तांच्या पादूका व महादेवाची पिंड आहे. दत्तस्थानापासून खालच्या बाजूस सर्व तिर्थ आहेत. जवळच अमृत कुंड असून येथे प्रथमच परशुराम व दत्तात्रय यांची भेट झाल्याचे सांगतात. दत्त शिखराच्या दक्षिणेस मैल दिड मैलावर अनूसयाचे शिखर असून येथेच अत्री ऋषिंचा आत्रम होता. दत्तात्रय व अनूसया यांच्या मूर्ती या सिखरावर आहेत. श्री दत्तचरित्रातील अनेक सुरस कथा याच भागात घडल्याचे सांगतात.

दत्तशिखरावर व अनूसया शिखर येथून भोवतालचा प्रदेश फारच रमणीय दिसतो. दत्त शिखरावरही अनूसया, विठ्ठल रखूमाई यांच्या मूर्ती आहेत. दत्त मंदिराबाहेर लक्ष्मीनारायण व धूनीधर




दत्त अशी दोन मंदिरे आहेत. धूनीतील दत्तांचे भस्म प्रसादिक मानले जाते. दरवाजाबाहेर पश्चिमेस उजव्या सोंडेचा गणपती आहे. जवळच कामाक्षीचे लहानसे मंदिर आहे. आसपास गोसावी महंताच्या अनेक समाध्या आहेत. अनूसया पहाडावर अनूसया व दत्तात्रय यांच्या मूर्तीखेरीज अत्रिऋषींच्या पादुका आहेत.

## ।। श्रीक्षेत्र देवदेवेश्वर ।।

माहूर गावालगतच्या पायथ्याशी महानुभावांच्या ताब्यात असलेले सुप्रसिध्द देवदेवेश्वर हे दत्तस्थान आहे. रेणूका व दत्तात्रेय यांच्या आज्ञेने एकदा ब्रम्हदेव क्षीरसमुद्रावर गेले आणि त्यांनी विष्णुला माहूरात आणले. विष्णुनी येताना आवळीचे झाड बरोबर आणले. विष्णु दत्तात्रेयांच्या आश्रमात आल्यावर परशुरामाने रेणूकेच्या सांगण्यावरून विष्णुच्या पोटात शिरून शंकराची प्रार्थना केली. परशुराम दत्तात्रेयांच्या आश्रमात जगाचे रक्षण करण्यासाठी म्हणून तीन देवांच्या रुपाने राहू लागला. हाच देवदेवेश्वर म्हणून प्रसिध्दिस आला. दत्तात्रेयांचेही मन येथे रमले व ते आवळीच्या झाडाखाली ध्यान धारणाकरू लागले. पिंगलनाग नावाचे ऋषीही या ठिकाणी दत्तात्रेयांच्या कृपेने महादेवाच्या रुपात राहिले. देवदेवेश्वर या प्रमाणे महादेव व विष्णू यांचे स्थान असून महानुभव दत्तप्रभूंच्या रुपात या स्थानास महत्व देतात. रोज सायंकाळी होणारी आरती येथे पाहण्यासाठी असते. दत्तप्रभूंना आळवितांना अनेकांचे अंगातील पिशाच्चबधा दूर होते. देवदेवेश्वरांच्या खालच्या बाजूस पद्मतिर्थ आहे: शंखातिर्थ, बद्रिनाथ अशी कांही स्थाने येथून जवळच आहेत.

माहूर गावातील किल्ल्यात एक ब्रम्हतीर्थ असून त्यास विझाळे म्हणतात. याच गडावर महाकालिकेची मूर्ती आहे. जम नावाच्या एका रजपूत राजाने हा किल्ला सहाव्या शतकात बांधला असल्याचे सांगतात. याचे स्मारक म्हणून 'जमठाकरी' नावाचा एक सण नागपंचमी प्रमाणे आषाढ शुध्द पंचमीस साजरा करतात कुल्यात गौतम झरा आहे. माहूरच्या वायव्य दिशेस पहाडात कोरलेले पांडव लेणे आहे. येथील तीर्थीस पांडव तीर्थ म्हणतात. रेणूका शिखरापासून चार मैलावर केलास टेकडी आहे. येथे एक शिवलिंग आहे. रेणूके पासून अर्ध्या मैलावर औंदुबर झरा आहे. अग्निकुंड, चरणतीर्थ, आत्मबोध तीर्थ, कमंडलू तीर्थ, कज्जल तीर्थ, मुलझरी, रामतीर्थ अशी आणखीही काही प्रवित्र स्थाने माहूर गडावर आहेत. जमदग्नीच्या खोरीत सुर्यतीर्थ, चंद्रतीर्थ, पापमोचन, केदार, मृंदुंगलेश्वर, कृणमोचन, काशी, प्रयोग, कपिला, भानू, परशू, गदा, रामगया इत्यादी नावाची क्षेत्रे आहेत. याच माहूल गडावर दसवंत, साधू महाराज, विष्णूदास इत्यादींना दत्तप्रभूंचा साक्षात्कार झाला. मातृतीर्था जवळच श्रीविष्णूदासांचा मठ आहे. विष्णूदासांचे बंधू श्रीगुरुदास महाराज यांचीही समाधी येथे आहे. दत्त, रेणुका, अनुसया, देवदेवेश्वर, परशुराम, अत्रि इत्यादींच्या वास्तव्यामुळे अनेक भाविकांचे चित्त माहुरगडाशी निगडीत झालेले दिसते. येथील पहाडावरील दाट झाडी व एकांत याचा लोभ साधकांना झाल्यास नवल नाही. अलीकडेच धनोडे येथे पैन गंगेवर मोठा पुल झाल्यामुळे रेणुका माता व दत्तगुरु यांच्या दर्शनास येणाऱ्या भाविकांची संख्या अफाट वाढली आहे. चैत्र पोर्णिमा, नवरात्र आणि दत्तजयंतीस माहूर गडावर मोठी यात्रा भरते.

❑ ❑ ❑

# भृगूतीर्थ...

- *अशोक मोहिते*, बडोदे (गुजरात)

'भृगूतीर्थ' हेच आजचे भरुच ! गुजरात मधील नर्मदेकाठी वसलेले शहर ! धार्मिक - पवित्र स्थळ ! हे शहर नर्मदेवरील असलेला 'गोल्डन ब्रिज' मुळे प्रसिध्द आहे.

हे नगर तीन ते चार हजार वर्षे जुने - पुराणे असावे असे ऐतिहासिक पुरावे उपलब्ध आहेत. महाभारताच्या 'सभापर्वा' मध्ये 'भरुकच्छ' चा उल्लेख आहे. 'भरु' म्हणजे समुद्र ! 'कच्छ' म्हणजे किनारा ! इ. स. पूर्व पाचव्या शतकामध्ये लिहल्या गेलेल्या बौध्द 'जातककथा' मध्ये आणि 'कथासरिता सागर' मध्ये 'भरुकच्छ' चा उल्लेख आढळून येतो. इ.स. पूर्व पांचव्या शतकामध्ये इथे 'अवंति' चा राजा ' प्रद्योत' याची सत्ता होती. इ. स. च्या आरंभकाळी 'नभोवहन' (क्षत्रप) हा तिथे राज्य करीत होता. जैनांचे अश्वावबोध तीर्थ, शकुनिका विहार तीर्थ याच नगरामध्ये होते. पौराणिक

**गुजरात मध्ये नर्मदा नदीच्या काठी असलेले हे तीर्थ अनेकांना अपरिचित असेल. नवनाथाचे स्थान असलेले हे क्षेत्र तेथील कबीरवडामुळे कबीर पंथीयाचेही श्रध्दास्थान आहे. एक निसर्ग रम्य क्षेत्र म्हणून आवर्जुन पहावे असे हे स्थान गुजरात मधील भरूच येथे आहे.**

संदर्भात म्हणायचे झाले तर देशाचे नांव म्हणून 'भरुकच्छ'ची नोंद मत्सपुराणांत आढळते. वल्लभूपुरचा राजा विरसेन चौथा याच्या संवत ३३० च्या ताम्रपत्रात सुध्दा 'भारुकच्छ'चा उल्लेख आहे. हिन्दु-पुराणांत तसेच गिरनार पर्वताच्या खडकावरील च्या शिलालेखात (इ. स. १५०) 'भृगुकच्छ' असा उल्लेख आहे. 'पेरिप्लस'च्या तसेच 'टोकीमीनी' च्या भुगोलातसुध्दा बारुगाझ, बारीगाझा, बोरगोझा ही नांवे दिलेली आढळून येतात. सातव्या शतकामध्ये हिन्दुस्थानच्या प्रवासाला निघालेल्या प्रसिध्द चिनी बौध्द साधु, 'ह्यु एन्संग'च्या पोथु, फारसी, व उर्द लिखाणामध्ये 'भरुच' तसेच 'भलोच' असा उल्लेख बघायला मिळतो. मराठा राजे या नगरीला भडोच म्हणत असे. इंग्रजांच्या काळांत हे नगर भडुच, भडोच व ब्रोच अशा नावांनी ओळखले जात होते.

या प्राचीन नगराची भृगुपुर, भृगुतीर्थ तसेच भृगुक्षेत्र अशी



भृगूऋषींचे कल्पना चित्र

विविध नांवे 'भार्गव' यांच्या वसाहतीमुळे प्रचलित झाली असावीत असे वाटते. या प्राचीन नगरीचेमूळ नांव भरकच्छ असावे आणि मागाहून ते भृगुकच्छ झाले असावे अशी एक मान्यता आहे. परंतु सामान्यपणे या नगरीला भृगुऋषींनी वसविली असल्या कारणाने तिचे नांव भृगुकच्छ ठेवले गेले असावे आणि मागाहून ते भरुच या नावांने प्रसिध्द पावले असेही मत ठामपणे मांडले जाते.

चोविस पुराणांपैकी 'भविष्योत्तर पुराण' मधील या नगराविषयीचा एक उल्लेख विशेष उल्लेखनीय आहे. तो असा -

एकदा विष्णुदेवाने देवी लक्ष्मीला विनंती केली की तुम्ही स्वतःसाठी वैकुंठ, क्षीरसागर गोलोक आणि प्रतापगड अशी चार धामं तयार करविलीत. पण आमच्या स्थानाचे काय ?'

'या सृष्टी मधील तुम्हाला आवडेल ते स्थळ पसंत करा, वैभव तुमच्या दाराशी लोळण घेईल....'असे लक्ष्मीदेवी उद्‌गारली.

उत्तम स्थळाच्या शोधात फिरता-फिरता भरुच जवळ आल्यावर लक्ष्मीदेवी म्हणाली - ' इथे नवनाथ (कामनाथ, भूतनाथ, सोमनाथ, भीमनाथ, जुवानाथ, काशीविश्वनाथ, सिध्दनाथ, पिंगळनाथ आणी गंगनाथ महादेव) तर करून राहिले आहेत. त्यांच्या सान्निध्यात पवित्र नर्मदा आहे, तेव्हां हे स्थळ पसंत करा....'

....आणि हेच स्थळ पसंत केले गेले. या नगरातील सद्याची 'सोनेरी लाईन्स' म्हणून ओळखली जाणारी टेकडी व तिचे हे नांव देवी लक्ष्मीच्या नांवावरून ठेवले गेले असावे ते असे - श्री (श्री म्हणजे लक्ष्मी) नगर ! असे ते श्रीनगर ! आणि लक्ष्मीचा साक्षात वास, मग अधिक काय पुसता ?

ब्रह्मलोक, गोलोक, वैकुंठलोक व स्वर्गलोकांमध्ये जी समृध्दी होती ती इथे दिसु लागली. कुबेरनगराला टक्कर देईल असे ते 'श्रीनगर' समृध्द व वैभवशाली ठरले. शिवाय खुद्द श्री विष्णुदेवाने लक्ष्मीदेवी सोबत इथे वास केला. सद्याचे 'सोनेरी महाल' तेच त्यावेळचे श्रीलक्ष्मीचे निवासस्थान होते, असे आज सुध्दा म्हटले जाते. सत्ययुगाचा अस्त झाल्यावर श्री लक्ष्मीदेवी व विष्णुदेव वैकुंठा मध्ये निघुन गेले. त्यावेळी त्यांच्या सोबतचा 'श्री नगरा' ची शोभा समृध्दी संपुष्टात आली....वगैरे.

श्रीनगरचा नाश झाल्यावर हा प्रदेश 'हेडंबावन' म्हणून ओळखला जाऊ लागला. हेडंबाची पूत्री 'हाटिका' हिच्या विनंतीने भृगुऋषी स्वतःच्या १८,००० शिष्यगणा सहीत या वनांमध्ये येऊन राहिले.

नर्मदा पुराणाच्या रेवा खंडा मध्ये म्हटल्याप्रमाणे नंदन संवत्सरात मार्गशीर्ष (शु.) पंचमी या दिवशी उत्तरा भाद्रपद नक्षत्राचा चंद्र आणि कुंभ राशीचा सूर्य होता. अशा या दिवशी नर्मदेच्या उत्तर किनाऱ्यावर कुर्म (कासव) याच्या पाठीवर विश्वकर्माचे स्मरण करून मोठ्या आनंदाने भृगुऋषींनी मोठे नगर वसविले. कुर्माच्या पाठीवर या नगराची स्थापना झाली म्हणून हे 'भृगुकच्छ' अशा नांवाने ओळखले जाऊ लागले, अशी पण एक मान्यता आहे...

सध्या भरुच मध्ये अस्तित्वात असलेली विविध धार्मिक स्थळे या प्रमाणे आहेत....

## ।। भृगुऋषीस्थान ।।

नर्मदेकाठी झाडेश्वर दरवाज्या बाहेर भृगुऋषींचे स्थान आले आहे. असे म्हटले जाते की या नगराची रचना करण्याआधी ते या स्थळी येऊन राहिले होते. या घुमटवाल्या मंदिरात १७ लिंगे आहेत. नुकताच या मंदिराचा जीर्णोध्दार करण्यात आला आहे. इथे ज्वालधर महादेव, तसेच दुसरी सप्त शिवलिंगे, मार्कण्डऋषी, दुर्वासऋषी, विष्णु-लक्ष्मी, गणेश, हनुमान, पार्वती वगैरेंची स्वरुपे आहेत. भृगुऋषींच्य लिंगासोबत दुसरी पाच लिंगे आहेत आणि दशावतार, दत्तात्रय, वराह, वगैरेंच्या मूर्ती आहेत. चार वेदांची पण लिंगे आहेत. या मंदिराच्या पटांगणात गणपती मंदिर, धर्मशाळा व भृगुऋषींनी गादी (बैठक) वगैरे आहेत.

## दशाश्वमेघाचे स्थान आणि सोमनाथ मंदिर

नवनाथ महादेव यांचा उल्लेख वर आलेला आहे. नदी किनाऱ्यावर निरनिराळ्या ठिकाणी ती नऊ नाथांची मंदिरे आली असून त्यात सोमनाथ महादेवाचे मंदिर पुरातन असून ते विशेष पवित्र स्थान गणले जाते. या स्थानाची पवित्रता लक्षात घेऊन त्याकाळी बली राजाने दहा अश्वमेघ यज्ञ या स्थळी केले होते. त्यामुळे या स्थळांच्या पावित्र्यात अधिक भर पडली असून आजसुध्दा भाविक लोक चातुर्मासाच्या तसेच सोमवती अमावास्येच्या दिवशी आणि ग्रहणाच्यावेळी यास्थळी नर्मदेमध्ये स्नान करून पाप - क्षालन करीत असतात.

## महारुद्राचे स्थान :

इथे महारुद्राला कड्यावर पींगळनाथ महादेवाचे एक लहान मंदिर आहे. ते पूर्वी अग्निनारायणाचे मंदिर म्हणून ओळखले जात होते. मंदिरा जवळ 'मुनि तलावरी' या नावाचा एक छोटा तलाव आहे. पंचतीर्थ करणारे श्रध्दाळू लोक नर्मदेत स्नान केल्यावर या तलावांत स्नान करीत असतात. तलावात पाणी नसले तर त्यातली माती अंगाला फासून घेतात. सध्या महारुद्राचे जुने पुराणे मंदिर अवशेषरुपी अस्तित्वात आहे. इथे श्रावण मासांत दर रविवारी जत्रा भरत असते.

या व्यतिरिक्त बरीच लहान मोठी मंदिर नदी किनारी आहेत. त्याचे प्रत्येकाचे स्वतंत्र महात्म्य आहे. स्थळा अभावी प्रत्येकाचा उल्लेख इथे शक्य नाही. तरीसुध्दा 'नर्मदा' मातेच्या मंदिराचा उल्लेख आवर्जुन केला पाहिजे. नर्मदेत स्नान केल्यानंतर तिच्या मूर्ती स्वरुपाचे या मंदिरात दर्शन घेतले नाही असे भाविक विरळा !...

शुक्लतीर्थ, भारतभूतेश्वर, शूळपाणेश्वर या तीर्थ स्थानी विषयी उल्लेख या लेखामध्ये विस्तार भयाने करीत नाही. त्या प्रत्येक तीर्थ क्षेत्रांविषयी स्वतंत्र लेख तयार होऊ शकतील एवढी

सामग्री उपलब्ध आहे. परंतु इथे 'कबीरवड' या स्थानाचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

### कबीरवड

नर्मदेमधील एकमेव बेट ! या बेटावर एकाच वटवृक्षाला असंख्य शाखा ! या बेटरुपी भू पृष्ठाला 'कबीरवड' का म्हटले जाते ? त्यामागे एक दंतकथा आहे, ती अशी -

भरुच शहरापासून १८ कि. मी. अंतरावर 'मंगलेश्वर' हे गांव आहे. याच गांवात प्रसिध्द 'वारुह तीर्थ' आहे. याच गावातली ती कथा. येथील दोन ब्राम्हण पुरोहित बंधु, तत्वाजी आणी जीवाजी ! त्यांनी संत सेवेचे व्रत घेतले होते. जो कुणी संत पुरुष स्वतःच्या घर-आंगणात प्रवेश करील व संताच्या चरण स्पर्शाने आंगणातील कोमेजलेल्या वृक्ष - लता पुन्हा पल्लवित होतील त्या संत पुरुषाला स्वतःचा गुरु करून पुजायचे असा त्यांचा संकल्प होता. त्यासाठी ते नित्य संतसेवा करीत असत.

त्यांना एकदिवशी त्यांच्या या सेवेचे फळ मिळाले. त्या दिवशी 'संत कबीर' यांचे आगमन झाले. 'संत कबीरा'च्या चरण स्पर्शाने कोमेजलेल्या वृक्ष-लतांना पुन्हा अंकूर फूटले. त्या दोघांनी 'संत कबीर' यांना तत्क्षणी 'गुरु' केले हे वेगळे सांगायला नकोच. संत कबीर १४६५ मध्ये या स्थळी आले होते. त्यावेळी त्यांनी 'दांतण'चा एक तुकडा इथे टाकला होता. त्या जागीच कालांतराने भव्य वटवृक्ष तयार झाला. या विशाल वटवृक्षाला पारंब्यातून त्याच्या अनंत अगणीत शाखा तयार झाल्या. तो आजचा हा कबीरवड ! संत कबीराचे नाव या वटवृक्षाला तेव्हा पासूनच जोडले गेले होते....

...निसर्गाची कमाल त्यानंतर घडली. नर्मदेच्या पूरांमुळे या वटवृक्ष भोवतालचा भूपृष्ठ शिल्लक राहून अवती भोवती नदीचे वहाते पाणी पसरले व नैसर्गिकरित्या हे बेट तयार झाले. मंगलेश्वरा पासून ते बेट जवळ असल्यामुळे नावेतून तिथे जाता येते. या विशाल वटवृक्षाची भव्यता प्रत्यक्ष तिथे जाऊन न्याहाळणे हा एक वेगळा अनुभव आहे. सध्या बेटावर या वृक्षासोबत संत कबीराचे मंदिर आहे...कबीर पंथीयांचे ते श्रध्देचे स्थान आहे...

❑ ❑ ❑

## साईनाथ माझा

तू साईनाथ माझा शिरडी ग्राम तुझा
चलारे, चलारे घेऊया दर्शन SSS ।।घृ।।
धन्य क्षेत्र शिरडी झालीसे पावन ।
साईबाबा तुमचे लागूनी चरण ।।
चलाहो तुम्ही आता । चरणी ठेवू माथा ।।१।।
समाधी मंदिरी । जाऊ या सकळ ।
पाहूया साईचे । चरण कमळ ।
सर्व दुःख हरते । पाहुनिया घटते ।।२।।
रात्रंदिन चाले । धुनी अव्याहत ।
बाबांनी लाविली । द्वारकामाईत ।।
पालखीची तेथे वारी ।। निघे ही गुरुवारी ।।३।।
पुढे दिसते हो । ती श्री चावडी ।
बाबांना बसण्या । जागा हो आवडी ।।
चलाहो तुम्ही भक्त । होऊ या सारे तृप्त ।।४।।
गुरुस्थान साईचे । जाऊया पहाण्या ।
स्फूर्तीस्थान आम्हा । आता ते जगण्या ।
निंबवृक्ष डहाळी । गोड झाली सगळी ।।५।।
लेंडी बागी किमया । दाविली साईने ।
जाळल्या पणत्या । विहीरी जळाते ।।
लाविले दोन वृक्ष । पाळीला एक अश्व ।।६।।
झाली वारी आता । झाले शांत मन ।
लागू दे ध्यास । तुझा रात्रंदिन ।
अरविंद ठेवी माथा । चरणी साईनाथ ।।७।।

*- अरविंद शिंदे*
अकोला

# हिमालयातील तीर्थक्षेत्र

- प्र. दि. कुलकर्णी

*'देवतात्मा हिमालय: ' असे हिमालयाला भारतीयांनी मोठ्या श्रध्देने - भक्तीने देवतात्मा म्हणून गौरविलेले आहे. हिमालय हे गंगा - यमुनेचे उगम स्थान असून या पर्वतरांगेच्या अंगाखांद्यावर अनेक तीर्थक्षेत्रे आहेत. त्या क्षेत्रांचा अत्यंत थोडक्यात परिचय श्री. कुलकर्णी यांनी प्रस्तुत लेखात करून दिलेला आहे.*

हिंदू संस्कृतीत तीर्थक्षेत्रांना अनन्य साधारण महत्व आहे. रामायण-महाभारत काळापूर्वीपासून आजतागायत हे महत्व असल्याचे आढळते. प्रभू रामचंद्र, भगवान श्रीकृष्ण, पांडव, अनेक ऋषीमुनी, संत सत्पुरूष तीर्थ यात्रा करीत असत. संत नामदेव रायांनी आपल्या गाथेत ज्ञानेश्वरादि भावंडासमवेत कोण कोणती तीर्थ क्षेत्रे पाहिली तेथे काय केले ? याचे मनोहर वर्णन केले आहे. आजच्याप्रमाणे जरी पूर्वी भौतिक प्रगती झाली नसली तरी अनंत हाल अपेष्टा सोसत, अडीअडचणींना तोंड देत भक्त भाविक तीर्थ यात्रा करीत । तीर्थ क्षेत्रांना जात असत. उत्तरोत्तर यात वाढच होत आहे. यातच तीर्थ क्षेत्रांचे महत्व । महात्म्य सामावले आहे.

हिंदुस्थानच्या चारी दिशांना । चारी उपदिशांना अनेक तीर्थ क्षेत्रे आहेत. भारताच्या उत्तरेस असणाऱ्या हिमालयात अनेक तीर्थक्षेत्रे आहेत. खरे तर संपूर्ण हिमालय हेच विश्वातील सर्वात मोठे तीर्थक्षेत्र आहे. ब्रम्हदेवापासून सर्वसामान्यांपर्यंत साऱ्यांनाच हिमालयाचे जबरदस्त आकर्षण आहे. याचे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे हिमालयातून वाहणारी गंगानदी. या भगवान श्रीकृष्ण हिमालयाला "स्थावरणां हिमालयः" असे म्हणतात. तर कवि कुलगुरु कालिदास हिमालयाला 'देवतात्मा' म्हणून गौरव करतात. अनेक लहान मोठ्या तीर्थांचा अधिष्ठाता हिमालय आहे. या लेखाद्वारे हिमालयातील तीर्थक्षेत्रे वाचकां समोर ठेवत आहे.

## "तीर्थक्षेत्राचे चार विभाग"

हिंदुस्थानची उत्तर सीमा भक्कमपणे सांभाळणाऱ्या हिमालयात एकूण असंख्य तीर्थे आहेत. भौगोलिक दृष्टीने सोयीचे तसेच जास्तीत जास्त तीर्थाचे दर्शन घेता यावे यास्तव हिमालयातील तीर्थक्षेत्राचे चार विभाग पाडता येतील. ते विभाग अन् त्यांची नावे पुढील प्रमाणे -

**● पंजाब - काश्मिरच्या भागातील तीर्थक्षेत्रे**

हिमालयाच्या एकदम पश्चिमेकडील असणाऱ्या पंजाब-काश्मिर भागात प्रामुख्याने कांगडा मंदिर । महामाया मंदिर । वैजनाथ पपशेला । ज्वालामुखी देवी । चिंतापूर्णी देवी । माणिक कर्ण सरोवर । श्री परशुराम स्थापित अंबिका देवी । अमरनाथ । श्रीनगरच्या भोवतालची सहस्त्रो तीर्थ । श्री शंकराचार्य पर्वत । शिवमंदीर । अनंतनाग । मार्तंड मंदिर । क्षीर मधानी मंदिर याशिवाय दरवर्षी आश्विन महिन्यात जेथे मोठी यात्रा भरते ते वैष्णवी देवीचे मंदीर याच भागात आहे.

**● कैलास - मानस सरोवर विभाग**

या परिसरात साक्षात ब्रह्मदेवाने अनेक वर्षे तपश्चर्या केली ती तपोभूमी आहे. भगवान श्री शंकराचे निवासस्थान असणारे कैलास तीर्थराज या भागात आहे. प्रवासाच्या दृष्टीने अत्यंत कठीण असणाऱ्या या परिसरात लहान मोठी अनेक तीर्थे आहेत. चीनच्या ताब्यात असणाऱ्या या भागात मानस सरोवर हे तीर्थ अतिपवित्र आहे. शांत नितल पाणी त्यावर निळे आकाश. दिव्यत्वाची प्रचिति येथे आल्याशिवाय रहात नाही.

**● श्री पशुपतीनाथ । मुक्तिनाथ । दामोदर कुंड - मांडकी गंगा विभाग**

भगवान श्री शंकराचे निवासस्थान पशुपतीनाथ अन्

मुक्तिनाथ ही सर्वात मोठी अशी दोन तीर्थ ठिकाणे या भागात आहेत. ब्रह्मा विष्णु महेश या देवदेवता ज्या कुंडात स्नान करण्यास्तव येत ते दामोदर कुंड तीर्थ क्षेत्रच आहे. याशिवाय गंगेची एक उपनदी मांडकी गंगा याच परिसरात आहे. याशिवाय लहान मोठी अनेक तीर्थे या भागात आहेत.

**● श्री जम्नोत्री । गंगोत्री । केदारनाथ । बदरीनाथ विभाग**

हिमालयातील तीर्थक्षेत्रांचा सर्वात मोठा अन् अनेक तीर्थ असणारा त्याचप्रमाणे सर्वात पवित्र समजला जाणारा हा भाग आहे. एका अर्थी हिमालयाच्या तीर्थयात्रेला येथूनच प्रारंभ होतो यास्तव त्याला तीर्थ यात्रेचे प्रवेशद्वार म्हणतात. येथून श्री हरीच्या नरनारायण स्वरुपास म्हणजे बदरीनाथ तीर्थास सुरवात होते. बदरी म्हणजेच श्री हरि यास्तव बदरीनाथ असे म्हणतात. त्याच्या प्रवेशाचे द्वार म्हणजेच हरिद्वार अगर हरद्वार होय. हर म्हणजे भगवान श्री शंकर त्यासच केदारनाथ । बदरीनाथ । अमरनाथ असे म्हणतात.


हरिद्वाराविषयी एक पौराणिक संदर्भ असा आहे - स्वर्गद्वारेण ततुस्यं गंगाद्वार न संशयः । हरिद्वार म्हणजेच स्वर्गाचे द्वार होय.

या ठिकाणी भक्तियुक्त अंतःकरणाने एक दिवस जरी मुक्काम केला तरी एक सहस्त्र गायी दान दिल्याचे पुण्य लाभते. 'अयोध्या मथुरा माया' या श्लोकातील माया म्हणजेच हरिद्वार तीर्थक्षेत्र होय. दर बारा वर्षांनी सूर्य मकर राशीत चंद्र मेष राशीत तर गुरु कुंभ राशीत प्रवेश केल्यावर येथे कुंभमेळा भरतो. या महामेळयास ४०।५० लक्ष भाविक श्रध्देने एकत्र येतात. सनकादिकापासून महर्षि नारदापर्यंत अनेकांनी या भागात श्रीमद्‌भागवत कथन केले ते हेच तीर्थ होय. मैत्रेय मुनींनी विदुराला याच परिसरात भागवत कथन केल्याचा उल्लेख सापडतो.

हरिद्वारच्या उत्तरेस 'सप्तस्त्रोत' नावाचा परिसर असून तेथे भगवान शंकराची अनेक देवालये आहेत. तेथे अनेक ऋषींनी तप केले. पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकरांनी या भागात घाट बांधला. सप्तर्षींनी अनेक वर्षे येथे तप करून अढळ स्थानाची प्राप्ती करून घेतली. याच्या जवळच कुशावर्त तीर्थ आहे. भगवान दत्तात्रयांनी येथे उग्र तप केले. या कुशावर्त तीर्थ निर्मितीविषयी एक आख्यायिका प्रचलित आहे. - दत्तात्रय एकदा तप करीत असताना त्यांच्या हातातील दर्भ म्हणजे कुश गंगा नदीत पडला. तेव्हा ते दर्भ वाहू लागले. तेव्हा दत्तात्रय गंगा नदीवर रागावले. तिने दर्भाभोवती आवर्त म्हणजे भोवरा निर्माण केला. परिणामी ते दर्भ भोवऱ्यात फिरत राहिले. यावरुन कुशावर्त तीर्थाची निर्मिती झाली. या तीर्थ स्थानाचा महिमा अपरंपार आहे.

**गंगाद्वारे कुशावर्ते बिल्वके नील पर्वते ।**
**स्नात्वा कनखले तीर्थे पुनर्जन्म न विद्यते ।** असा मंत्र म्हणतात.

हरिद्वारात हरिकी पौडी नामक क्षेत्र आहे. मूळ शब्द पैडी असा आहे. पैडी म्हणजे पायरी. यास्तव हरिकीपैडी असे म्हणतात. त्याचा अपभ्रंश होताना पैडीचे पौडी झाले आहे. गंगानदीच्या तीरावर दोन्ही बाजूस पाषाणाच्या पायऱ्या बांधल्या असून त्रिकाल स्नान । 



संध्या करणारांना मोक्ष प्राप्ती होते असा भाविकांचा समज आहे. स्नानोत्तर हरिच्या चिंतनात भाविक अनेक तास व्यतित करतात. याच परिसरात दशाश्वमेघ घाट नामक तीर्थ आहे. या घाटावर भाविकांची अलोट गर्दी असते. याच्याच जवळ ब्रह्मकुंड नामक महातीर्थ आहे. यालाच कोटीतीर्थ असेहि म्हणतात. राजा विक्रमादित्याचा भाऊ भर्तृहरि याने अनेक वर्षे उग्रतप केले यास्तव ते कोटितीर्थ आहे. हरिकीपैडी पासून कोटितीर्थांना जोडणाऱ्या पायऱ्या राजा विक्रमादित्याने बांधल्या. या पवित्रतम परिसरात रात्रौ ७.२२ ला गंगेची आरती अत्यंत भक्तिभावाने करतात. सर्वत्र घंटानाद सुरु असतो. आरतीपूर्वी दिव्यांचे सुरेख प्रतिबिंबि नदीतील पाण्यावर पडलेले असते तर आरतीनंतर सहस्त्रोदीप नदीच्या प्रवाहात हेलकावे खात खात जाताना, पाहून नेत्राचे पारणे फिरते. सर्वत्र मंगलमय वातावरण असते. अत्यंत श्रध्देने भाविक गंगेची आरती म्हणतात-

**ॐ जय गंगे माता । श्री जय गंगे माता ।**
**जो नर तुमको ध्याता । मन वांछित फल पाता ।।धृ।।**

हरिद्वार म्हणजे हिमालयाचा पायथा आहे. गंगेच्या काठावर दुतर्फा लहान मोठी अनेक मंदिरे आहेत. हरिद्वारच्या अति उत्तरेस नीलकंठ महादेवाचे मंदिर असून तेथे मानवी वस्ती नाही. त्याच्या उत्तरेस चंडीदेवीचे महाकाय मंदीर आहे, त्या मंदीरातील देवीचे

दर्शनार्थ रोज एक सिंह येतो ही सत्यकथा आहे. त्याच्याजवळ ज्वालापूर, कनखल ही पवित्र स्थाने आहेत. कनखल या ठिकाणी दक्षाने यज्ञ केला होता. त्या यज्ञास भगवान शंकरास आमंत्रण नव्हते. दक्षाची कन्या पार्वती ही त्या यज्ञाच्या दर्शनाला गेली. तेव्हां दक्षाने आपल्या जामाताचा-भगवान शंकराचा अपमान केला. तो अपमान सहन न झालेल्या पार्वतीने यज्ञात उडी घेतली. यज्ञ नारायण तिला घेऊन वर आले तेव्हां तिला सती पार्वती म्हणू लागले. ही पौराणिक घटना याच ठिकाणी घडली.

हरिद्वारकडून ऋषिकेशला जाताना गंगेकाठी भीमगोडा नामक तीर्थस्थान आहे. पराक्रमी भीमाने या ठिकाणी उजवा गुडघा टेकून अनेक वर्षे तप केले. यास्तव भीमगोड असे म्हणतात. त्या ठिकाणच्या जवळ परमेश्वराच्या २४ अवतारांचे भव्य मंदीर आहे. त्या मंदीराच्या उत्तरेस गंगा नदीचे सात प्रवाह आपणास स्पष्टपणे दिसतात. सभोवती अतिशय दाट जंगल असून त्यात भगवान सत्यनारायणाचे रेखीव मंदीर आहे. आतील श्रीची मूर्ति अतिशय नाजूक, रेखीव असून त्यालाच ऋषिकेश असे म्हणतात. भगवान श्री विष्णुचेच ऋषिकेश हे नाव आहे. हृषिक म्हणजे इंद्रिये व त्याचा ईश म्हणजे अधिष्ठाता यास्तव ऋषिकेश अस म्हणतात. फार फार वर्षापूर्वी येथे अनेक ऋषि तप करीत असत. यास्तव ऋषींची तपोभूमी तीच ऋषीकेश तीर्थ होय.

ऋषिकेश येथील त्रिवेणी घाट प्रसिध्द आहे. त्या घाटाजवळ भरताचे सुरेख मंदीर आहे. भरताचे हे विश्वातील एकमेव मंदीर आहे. त्यास राम समजून वंदन करतात. याशिवाय अनेक लहान मोठी मंदीरे आहेत. या मंदीराच्या उत्तरेस राम-लक्ष्मणाची तपोभूमी आहे. येथे भगवान शंकराचे अप्रतिम मंदीर आहे. भरताचे मंदीरासमोर गंगा नदीवर दोन्ही तीरांना लोखंडी साखळीने बांधलेला लक्ष्मण झुला आहे. त्यापलिकडे स्वर्गाश्रम नावाचे अत्यंत शांत ठिकाण आहे. येथील गीताभवनाच्या उत्तरेस २० मैलावर नीलकंठ महादेवाचे रमणीय तीर्थ आहे. रम्य, शांत, निवांत, दाट झाडीने भरलेले असे हे ठिकाण खरोखर स्वर्गाश्रम आहे.

ऋषिकेशाच्या उत्तरेस १० मैलावर गंगोत्री, जम्नोत्री यांचा सुरेख संगम आहे. येथे अनेक मंदीरे असून एकदम निरव शांतता आहे संगमाच्या आसपास कल्याणी, सिलक्यारी, गडी गंगाणी, यमुना पट्टी, हनुमान पाडी, बटमलवाला या नावांची तीर्थ ठिकाणे आहेत. येथे जाण्यास्तव अत्यंत अरुंद वाट असून खळखळ वाहणारा प्रवाह व खोलखोल दऱ्या आहेत. दाट झाडीत महादेवाची अनेक मंदीरे आहेत.

येथूनच पुढे उत्तर काशीला जाण्याचा मार्ग आहे. वाटेत भैरव, विश्वनाथ, एकादश रुद्र, गोपेश्वर, परशुराम, दत्तात्रय, अन्नपूर्णा, जडभरत आदि मंदीरे आहेत. प्रत्यक्ष उत्तर काशीत आद्य शंकराचार्यांचे अत्यंत सुरेख मंदीर आहे. उत्तरकाशीत गंगेला वारणा गंगा, असि गंगा या दोन उपनद्या येथून मिळतात. याचेच संयुक्त रुप वाराणशी असे झाले आहे. येथून पुढे केदारनाथाकडे जाण्याचा मार्ग आहे. वाटेत भटवाडी, धराली, इन्सिल यासारखी तीर्थे आहेत. यांच्या परिसरात जान्हवी अगर जन्हू गंगा ही मूळ गंगेस येऊन मिळते. कित्येक सहस्त्रोवर्षापूर्वी जन्हू नामक ऋषी येथे तप करीत होते. आजहि अनेक ऋषि तप करतात. यास्तव ही तपोभूमी आहे. सर्वत्र 'ॐ नमः शिवाय' अगर बोलो गंगा माता की जय अथवा 'जय केदारनाथ की जय' याचा जयघोष सुरु असतो.

केदारनाथावरुन आलेला मंदाकिनीचा प्रवाह याच ठिकाणी गंगेला मिळतो. त्याच्याजवळ वासुकी सरोवर आहे. सरोवराकाठी गणेश मंदीर आहे. त्याच्या आसपास गरम, थंड पाण्याची कुंडे आहेत. यालाच अमृत कुंड म्हणतात. याच ठिकाणी भगवान शंकराची धर्मपत्नी-पार्वती हिचा जन्म झाल्याने ते पवित्र स्थळ मानतात. येथून पुढे बदरीकेदारला बर्फाच्छादित शिखरे पाहण्यास्तव जातात. घटकेत पाउस, उन, धुके अशा लपंडाव सुरु असतो. उत्तरेकडून वाहणाऱ्या मंदाकिनीच्या काठावर अतिभव्य असे कुबेर भांडार तीर्थ आहे. त्या तीर्थाजवळ पांडवाच्या पाषाणाच्या मूर्ती आहेत. गाभाऱ्यात तुपाचा दिवा तेवत असतो. मंदीराभोवती अनेक लहान मोठी कुंडे अन् शिवमंदीरे आहेत.

त्याच्या उत्तरेस गुप्तकाशी नामक पवित्र स्थळ आहे. येथे शंकराची विलक्षण मूर्ती आहे. भगवान शंकराच्या पिंडीवर पार्वतीची रेखीव मूर्ती आहे. याशिवाय अर्धनारीनटेश्वराची मूर्ती आहे. या मंदीराच्या आवारात मनकर्णिका कुंड असून एका बाजूने गंगा तर दुसऱ्या बाजुने यमुना येते. ग्रहण काळात येथे स्नानास्तव खूप गर्दी असते. येथून पुढे केदारनाथाला जातात. वाटेत जंगलात महादेवाची अनेक मंदीरे आहेत. त्याची मोजदाद करणे अशक्य आहे.

केदारनाथ ही बाणासूराची राजधानी होती. महाभारत काळात येथे उषा व अनिरुध्द यांच्या विवाहा निमित्ताने महायुध्द झाले. या युध्दात भगवान शंकराविरुध्द भगवान श्रीकृष्ण एकमेकासमोर आले. ब्रह्मदेवाने मध्यस्थी केल्यावर पृथ्वीचा अनर्थ टळला. यास्तव येथे सर्वांची मंदिरे असून त्यापाशी पवित्र कुंडे आहेत. सर्व मंदीरे पाषाणाची आहेत. आतील श्रीच्या मूर्ती फारच सुरेख, नाजूक आहेत.

केदारनाथापुढे तुंगनाथाचा डोंगर आहे. येथे महादेवाचे प्राचीनतम मंदीर आहे. केदारनाथला गेलेला यात्रिक तुंगनाथला जातोच. त्या डोंगराच्या एकीकडून ३५/४० फूटावरून खाली आकाशगंगा झेपावते. फेसाळत जाणारा धवल गंगौघ भाविकांना रौद्रतेचे दर्शन घडवतो. उंचावरून खाली येऊन ती नदी पाताळात


जाते असे समजून तीला पाताळ गंगा असे म्हणतात. तुंगनाथ हे महादेवाचेच एक नाव आहे. या मंदीरापासून द्रोणाचल, नंदादेवी, केदारनाथ, पंचचूती, बदरीनाथ आदि मंदीरांचे दर्श होते. तुंगनाथ मंदीराच्या जवळच चंद्रवदनी देवीचे मंदीर आहे. आदिशक्ति पार्वती हिचे चंद्रवदनी हे नांव आहे. भगवान शंकराने आपला तिसरा नेत्र उघडून कामदेवाला भस्म केल्याचे ठिकाण येथेच आहे. त्याच्यापाशी पिपलीकोटी नामक तीर्थ आहे. या परिसरातील अलकनंदा नदीचे पात्र सर्वांना माहून टाकते. येथून पुढे भाविक जोशी मठाकडे जातात. वाटेत भगवान नृसिंहाचे महाकाय मंदीर आहे. आतील श्रीची मूर्ती अतिशय उग्र आहे. पाषाणाची मूर्ती असून अत्यंत सजीव आहे. आद्य शंकराचार्यांनी येथे उग्र तप केले. बदरीनाथाचे मंदीर बर्फवृष्टीने जेव्हां बंद होते तेव्हा येथूनच मनोभावे त्याची पूजा करतात. उजवीकडून विष्णु प्रयागला जाता येते. तेहि एक तीर्थ हिमालयाच्या कुशीत आहे. विष्णु प्रयाग या ठिकाणी विष्णुगंगा, अलकनंदा एकत्र येऊन पुढे धावतात.

या परिसरापासून जी चढण सुरू होते ती थेट आणखी बदरीनाथापर्यंत. भगवान शंकराचे वास्तव्य या ठायी होते. अनेक वर्षे तेथे त्यांनी उग्र तप केले. याचे प्राचीन नांव विशाला असे आहे. महाभारत काळात अनेक ऋषिंनी येथे तप केल्याचे उल्लेख आहेत. मंदीरानजीक ब्रम्हकपाल नामक पर्वत आहे. तेहि तीर्थ क्षेत्रच आहे. तेथे यात्रिकाद्वारा पिंडदान केले जाते. येथील मंदीरातील महादेवाची आरती बदरीनारायणाच्या मुखावरील तेज उठून दिसते. थोडे उत्तरेस गेले तर अलकनंदा, सरस्वती यांचा सुरेख संगम पहावयास मिळतो. याच संगमावर भगवान व्यासांनी अनेक स्तोत्रे लिहील्याचा उल्लेख सापडतो. तेथून पुढे रुद्र प्रयाग तीर्थ स्थळ लागते. तेथे अलकनंदा, मंदाकिनी एकत्र आलेल्या दिसतात. या संगमावर भगवान शंकरांनी ब्रह्मर्षी नारदास संगीत कला शिकविल्याची आख्यायिका आहे. सांप्रत काळी तेथे महादेवाचे मंदीर आहे. तेथून पुढे तीन,चार मैलावर देव प्रयाग नामक तीर्थ आहे. त्या ठिकाणी अलकनंदा, भगीरथी यांचा संगम आहे.

अशा रितीने हरिद्वार पासून सुरु झालेली ही तीर्थ यात्रा अखेरीस देव प्रयागला संपन्न होते. पहिल्या तीन विभागापेक्षा या विभागात अनेक तीर्थ ठिकाणे आहेत.

## ।। अमरनाथ गृहा ।।

या शिवाय हिमालयात अमरनाथ हे अतिपवित्र तीर्थ स्थळ आहे. श्री नगरमार्गे अमरनाथला जाताना महादेवाची लहान लहान मंदीरे आहेत. प्रत्यक्ष अमरनाथ या ठिकाणी श्रावणी पोर्णिमेस खूप मोठी यात्रा भरते. बर्फाची ८ फूट उंचीची महादेवाची पिंड तयार झालेली असते. भगवान श्रीविष्णूने याच परिसरात वराह अवतार घेतल्याने तेथे विष्णुचे सुरेख मंदीर आहे. येथून पूर्वेकडे पिसूघाटी चढून गेल्यावर शेषनाग नामक भव्य सरोवर आहे. समुद्रसपाटीपासून त्याची उंची १२ सहस्त्र फूट आहे. १ मैल लांब अन् ५ मैल रुंद असा भव्य परिसर सरोवराने व्यापला आहे. प्रत्यक्ष शेष भगवानाचे वास्तव्य या ठायी आहे अशी भाविकांची श्रध्दा आहे. यास्तव या सरोवरात स्नान करणारा नास्तिक देखील आस्तिक बनतो. अशा अनेकांचा दावा आहे. सरोवराच्या जवळ भव्य अशी तीन मंदीरे असून त्यात ब्रम्हा, विष्णु, महेश यांच्या



अमरनाथ गुहेतील बर्फाची पिंड

प्रतिमा आहेत. येथून पूर्वेकडे गेल्यास गंगेला तिच्या पाच उपनद्या येऊन मिळतात. यास्तव त्या ठिकाणी गंगेला पंचतरणी म्हणतात. तेथून पुढे तीन मैलावर साक्षात अमरनाथचे दर्शन घडते. य पिंडीचे दर्शन होणे म्हणजे मानवी जन्म सार्थकी लागणे ही भाविकांची श्रध्दा आहे. निसर्गाचा चमत्कार येथे पहावयास मिळतो.

तेथील स्थानदवतेचे चारोधाम, सप्तपुऱ्या, बारा ज्योतिर्लिंग, अष्टविनायक, पंढरपूर, गाणगापूर, तुळजापूर आदि तीर्थ स्थळांना आयुष्यात किमान एकदा जाऊन यावे. ज्यांना जाणे जमत नाही त्यांनी घरात बसून जरी त्यात्या स्थळंचा, तीर्थक्षेत्रांचा मनोभावे उच्चार केला तरीही पुण्य लाभते. यास्तव म्हणतात - काशीस जावे, नित्य वदावे, ते एवढ्या साठीच. त्यातहि जर शरीराने योग्य साथ दिली तर हिमालयातील उपरोक्त सर्व तिर्थस्थाने अवश्य करावीत.

❑ ❑ ❑

# एका दत्त भक्ताची श्रीक्षेत्र गिरनार यात्रा

**श्री माधवराव भागवत 'श्रीसाईलीला' चे जुने लेखक आहेत ते साईभक्त असून श्री दत्तात्रय हे त्यांचे दैवत आहे. अशा वृध्द, अपंग भक्ताने गिरनार सारख्या दुर्गम यात्रेचा केलेला हा वृत्तांत, अनेक भक्तांना गिरनार यात्रेची प्रेरणा देईल.**

जन्माला येणारा प्रत्येक प्राणी हा यात्रेकरुच असतो, जन्माने त्याची 'जीवनयात्रा' सुरु होते व मृत्यूने म्हणेजच महायात्रेने त्याची सांगता होते. त्याला मनुष्य प्राणी हासुध्दा अपवाद नाही. गुरुने 'गुरुमंत्र' दिला की, गुरु शिष्याला प्रथम 'तीर्थयात्रा' करण्यास सांगतो. यात्रेचे महत्त्व हे साधकाचे दृष्टीने अनन्यसाधारण असेच आहे. यात्रेने साधकाचे उन्नयन व्हावे, उत्कर्षव्हावा, विकास व्हावा, त्याची अध्यात्मिक बैठक मजबूत व्हावी, पक्की व्हावी, तो अध्यात्ममार्गात स्थिर व्हावा, त्याला समाजाचे वास्तव्यदर्शन व्हावे, लोकांचे राहणीमान कळावे, त्यांचे दुःख, हालअपेष्टा, त्यांच्या गरजा अवघड नाही. मनुष्य जेव्हां अध्यात्ममार्गात शिरतो, तेव्हा तो आतून बाहेरुन निर्मळ शुध्द व्हावा लागतो. तरच तो त्या मार्गात स्थिर होतो नाहीतर संतश्रेष्ठ तुकोबाराय म्हणतात त्याप्रमाणे 'नाही निर्मळ मन। त्यासी काय करील साबण ।' नाहीतर मग 'सखू जाते पंढरापूरा वेशीपासून येते घरा ।' साधकांचे मन व तन पूर्णपणे यात्रेशी एकरुप व्हावे. संसाराचा व्याप आणि ताप विसरुन गेला पाहिजे. तरच त्या यात्रेचा उपयोग.

*ऊंचे गढ गिरनार । बादलसे बाते करे ।*
*हवा ऐसी जोर से बहती करे । जहा न कोई ठहर सके ।*

वरील ओळीतून गिरनार पर्वतेच्या दुर्गमतेचा, अवघडपणाचा अंदाज यावा गेली चारपाच वर्षे मी गिरनार यात्रेसाठी प्रयत्न करीत होतो, पण योग कांही येत नव्हता. त्याला कारण काळ अन वेळ याच गणित जमत नव्हतं. त्यातून मी वृध्द, अंध, बधीर, अपंग म्हणजे कुणाच्या मदतीविना यात्रा घडणे केवळ अशक्यच, पण म्हणतात ना, त्याप्रमाणे इच्छा असली की मार्ग सापडतोच दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे गुरुची व ईश्वराची कृपा झाली किं, मग **मुकं करोति वाचालं । पंगुं लंघयते गिरिम् ।** असा दैवी चमत्कार घडतो व माझ्या सारखा अपंग गिरनारची तीर्थयात्रा करतो.


## जुनागड मार्गे गिरनार तलेटी

मी व माझे मित्र श्री. गडकरी व श्री. सुभाष दिघे असे तिघे बॉम्बे-अहमदाबाद (गुजरातमेल) या गाडीने सुरत गाठले व तेथील श्री. गडकरी यांच्या मित्राकडे वस्ती करुन रात्री १०.३० च्या बसने जुनागडा गेलो. तेथे गडकारी यांचे नातेवाईकांकडे मुक्काम करुन सायं. ७।। वा. रिक्षाने गिरनार तलेटी (गिरनार पायथा) येथे रात्री ८।। वा. पोचलो.

तिथेच धर्मशाळेत सामान ठेवले, हातपाय तोंड धुवले व रात्री ९ वा. आम्ही गिरनार तलेटी हा परिसर पहिला. त्यात लंबेहनुमान, संतोषीमाता व श्रीराम मंदिर पाहिले, तसेच सर्व बाजारहाटही फिरुन पाहिला, इथे सर्व प्रकराची अत्यावश्यक वस्तूंची दुकाने भरपूर आहे, पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे तीर्थक्षेत्र असूनही इथे हार किंवा फुलाचे एकही दुकान नाही. भाविकभक्तांस प्रेमळ सूचना म्हणूनच केवळ हे निवेदन आहे. कारण इथे आल्यावर हार, फुले यासारख्या नाशीवंत माल मिळणार नाही व मग नाराज व्हावे लागेल, तेव्हां ज्याला हार व फुले पाहिजे असतील त्यांनी जुनागढ येथून आणावित.

इथे सर्व धर्मशाळा पहाटे ५ वा. उघडतात व रात्री १० वा. बंद होतात. रात्रभर बंदच असतात.

आम्ही रात्रभर विश्रांती घेतली व पहाटे ४ वाजता उठून सर्व आन्हिक उरकून पहाटे ५वा. प्रवेशद्वार उघडल्यावर बाहेर पडलो. मग पायथ्याशीच असलेल्या शक्तीदेवतेचे म्हणजे बजरंग




गिरनार पर्वतावरील दत्तपादुका

बली मारुतीचे दर्शन घेतले तेथील साधू, संत, महंत यांच्या पाया पडलो व पायऱ्याचढायला सुरुवात केली. त्यादिवशी चांदणे होते. त्याचा फायदा आम्हाला चांगलाच झाला. थोडे चढून गेल्यावर थंडी कुठच्या कुठे पळून गेली ते कळलेच नाही, व घाम फुटायला लागला, आम्ही आमचे स्वेटर काढून ठेवले. जसजसे वरवर चढू लागलो, तसतसे नागमोडी वळणे घेत चाललेल्या सापाप्रमाणे दिसले, पण पुढे असे कळले की, हे खांब फक्त अंबाजी मंदिरापर्यंतच आहेत, पुढे तेवढाच दुर्गम असा प्रवास आहे. पायथ्यापासून तो थेट अंबाजी मंदिरापर्यंत अक्षरशः हजारो दुकाने आम्ही दुतर्फा पाहिली. ती सर्व दुकाने अत्यावश्यक वस्तूंची म्हणजे चहाची, नारळ, अगरबत्ती, फोटो, हॉटेल, लिंबू सरबत, वगैरेंची होती. येथे वर जायला 'डोली' मिळते. त्याचप्रमाणे वृध्द, अपंग, अशक्त, लहान मुले यांना नेण्यासाठी भाड्याने मजूरहि मिळतात जागोजागी विश्रांती स्थाने व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली आहे.

## माली परब

गिरनार तलेटि पासून साधारण एक तास चालल्यावर 'माळी परब' नावाचा भाग लागतो. तिथे जाण्यासाठी पायऱ्यांची 'पायवाट' आहे. दुतर्फा छोटी छोटी दुकाने व विश्रांतीसाठी विश्रांती स्थाने आहेत. तसेच पिण्याच्या पाण्याचीही चांगली व्यवस्था आहे. 'माली परब' टाकून पुढे गेले कि 'उपर कोट' नांवाचा भाग लागतो. हा कोट म्हणजे किल्ला मोठ्यामोठ्या दगडांचा उपयोग करुन तो किल्ला बनविला आहे. सुरुवातीला भव्य असे प्रवेशद्वार आहे. चारीबाजूला तटबंदी असून, मोर्चे बांधणी व शत्रूवर मारा करण्यासाठी बुरुज आहेत. या किल्ल्यात गुजरातचा राजा वास्तूपाल व तेजपाल यांनी बनविलेली छोटी छोटी मंदिरे म्हणजे उत्तम, आकर्षक असा कारागिरीचा नमुनाच आहे.याचे खोदकाम व रंगकाम, अत्यंत मनोहारी, विलोभनीय, प्रेक्षणीय आहे. ते इतके चित्ताकर्षक आहे कि, इथून उठूच नये; अखंड सौंदर्याचा नेत्रसुख घ्यावे असेच वाटते.

तिथून पुढे गेल्यावर थोड्याच अंतरावर राजा भर्तृहरी व राजागोपीचंद यांची मंदिरे लागतात. यापुढे 'राणकदेवीची शिळा' लागते याची कथा अशी-पूर्वीच्या काळी पर्वतांना पंख होते, त्यामुळे ते पर्वत इकडून तिकडे उडत त्यामुळे प्रचंड अशा पाषाण शिळा, नव्हे शिलाखंड कोसळत व त्यामुळे अपरिमीत अशी जीव हानी होत असे. म्हणून इंद्र देवाने वज्राने पंख कापण्यास सुरुवात केली, त्या भितीने गिरनार पर्वत समुद्रात लपून बसला. पार्वतीने खूप आग्रह केला तेव्हा भगवान शंकर आणि भगवान विष्णू यांनी समुद्राला पाच योजने मागे हटण्यास सांगितले त्याप्रमाणे समुद्र मागे हटल्यावर त्याला समुद्रातून वर काढले.राणकदेवी ही सती साध्वी होती, ती तपश्चर्या करीत होती, त्यावेळी तिला तपोभंग करण्यासाठी गिरनार पर्वतावरील मोठमोठ्या शिळा खाली तिच्यावर कोसळू लागल्या, अशी एक शिळा वरुन खाली कोसळत असतां तिने तेथीलच गवताची काडी घेतली व त्या कोसळणाऱ्या शिळेला लावली, त्याबरोबर ती कोसळणारी प्रचंड शिळा तिथेच अधांतरी थांबली, ती अद्यापही तशीच आहे. यावरुन तपश्चर्येमध्ये किती सामर्थ्य आहे हे दिसून येते. हा हि एक अदभूत दैवी चमत्कार तेथे पाहावयास मिळतो. तेथून पुढे गेल्यावर 'दत्त पादूका स्थान आहे. आत छोटीशी गुहा आहे.याच गुहेत दत्तगुरुंनी बाल स्वरुपात तपश्चर्या केली, पुढे लोकांचा फारच त्रास होऊ लागला म्हणून त्यांनी आपले स्थान हलविले, तेच आत्ताचे उंच दुर्गम, अवघड, असे स्थान आहे, त्यानंतर महाकाली, खोडीयार माता, संतोषी माता ही तीन सुंदर मंदिरे लागतत.

## नेमीनाथाचे सुंदर मंदिर

या भागातील मुख्य आकर्षण म्हणजे जैन देरासर हे होय, इथे भगवान नेमीनाथ यांचे सुंदर मंदिर आहे. हे मंदिर म्हणजे शिल्पकला, वास्तूकला, खोदकाम, रंगकाम यांचा अपूर्व असा संगम आहे. या मंदिरावर जैन व बौध्द कालीन कलेचा ठसा उमटलेला दिसतो यावरुन या भागात जैन धर्माचे वर्चस्व, फैलाव, किती होता हेच सिध्द होते. याशिवाय अनेक छोटीछोटी मंदिरे

म्हणजे मंदिर संकुले आहेत. त्यात चोवीस तीर्थंकर विराजमान झालेले आहेत. गुहेत विराजमान झालेले अमीझरा पार्श्वनाथ भगवान यांचे मंदिर व पुतळा अत्यंत प्रेक्षणीय आहे. पार्श्वनाथांच्या पुतळयासमोर खिडकीवजा झरोका आहे. पुढेच ध्यानधारणेसाठी आसन आहे. भल्या सकाळी उगवत्या सूर्याची सोनेरी किरणे पार्श्वनाथ भगवान व नेमीनाथ भगवान यांच्या मुखावर पडतात त्यांची शोभा आणखीच वाढते. याठिकाणी दरवर्षी हजारो यात्रेकरू पूजा, दर्शनासाठी येतात. हा सर्व परिसर गुजरात सरकारच्या पुरातत्व विभागाच्या ताब्यात आहे.

पुढे 'घटीघटूका' येते. इथे असलेल्या भव्यप्रतिमा जैन धर्माच्या वैभवाची साक्ष देतात, त्यांच्या जवळच भीमकूंड आहे. जेव्हा उपरकोटची दुरुस्ती चालू होती तेव्हा ही कुंडे बांधली गेली. त्याशिवाय सुरजकुंड, ज्ञानवाव वैगेर जलायशही आहेत. उपरकोट मध्ये जैन यात्रेकरूनची राहण्याची सोय आहे. इथून पुढे गेल्यावर राजूल गुफा लागते ही गुफा एकांत जागी असल्यामुळे तिच्यात जैन साधू , मुनी भोजन घेतात व तपसाधना करतात. पुढे सातपुडा लागतो. सातपुडातून म्हणजे डोंगरातून पाणी वाहत येते. म्हणून सातपुडा म्हणतात, येथील पाणी थंडगार, गोड व पाचक आहे. तसेच येथे आंघोळीसाठी छोटीछोटी कुंडेही आहेत, पुढे गेल्यावर ब्रह्मचारी श्री रामानंद महाराज यांनी अत्यंत परिश्रम पूर्वक बनवलेली धर्मशाळा आहे. ती उपरकोटवर येते. इथे साधू, संत, व यात्री यांना राहण्याची सोय आहे. हिला जटाशंकर धर्मशाळा म्हणतात.

## गोमुख गंगा

तिथून पुढे गेल्यावर 'गोमुख गंगा' लागते. याची पुराणात कथा आहे ती अशी - सत्ययुगात सत्यधाम ऋषी यांनी ईश्वराला प्राप्त करण्यासाठी पुष्कर कुंडात १००० वर्षे तप केले. येथे घोर तप करून सुध्दा त्यांना ईश्वर दर्शन झाले नाही. पण आकाशवाणी झाली या जन्मी तुला माझे दर्शन होणार नाही, कारण लहानपणी तू तहानलेल्या गायीस काठीने मारले व प्यायला पाणी ही दिले नाहीस, हे तुझे पाप जेव्हा नष्ट होईल तेव्हा तुला माझे दर्शन होईल. त्यामुळे ते फार दुःखी झाले पण पुन्हा आकाशवाणी झाली, निराश होऊ नकोस तू गिरनार पर्वतावर जाऊन तप कर गंगेला प्रसन्न कर, म्हणजे गाईच्या मुखातून गंगा प्रगट होईल. त्या पवित्रपाण्याने स्नान केल्यास सर्व पापे नष्ट होतील, म्हणून इथे गाईच्या मुखांतुन गंगा प्रकट झाली म्हणून याला 'गौमुख गंगा' म्हणतात. इथे गंगेश्वर महादेव, बटुकभैरव, भगवान शंकर अशी चोवीस देवांची पादुकास्थाने आहेत.

यानंतर साचा काकाची झोपडी लागते. इथे पूर्वी झोपडी होती. त्यात महात्मा श्रीशंकरगिरी राहात असत. एके दिवशी महाकाली देवी त्यांच्या स्वप्नात आली व म्हणाली, इथे माझी स्थापना कर, म्हणून त्यांनी महाकाली देवीची स्थापना केली व अतिशय सुंदर व भव्य अशी महाकालीची स्थापन केली, हिचे दर्शन घेतल्यास सर्व पापे नष्ट होतात. इथे पाण्याची व राहण्याची उत्तम व्यवस्था आहे. इथे जवळच 'कपिलाधारा' नामक कुंड आहे.


## अंबाजी मंदिर

गिरनारचे रक्षण करण्यासाठी 'भवानी' इथे अंबाजी रुप धारण करुन प्रकट झाली, त्याच ठिकणी अतिशय सुंदर असे 'अंबाजी मंदिर' बांधले आहे. ही देवी अंत्यंत उंच अशा टोकावर (पर्वतावर) विराजमान झाली आहे, हे स्थान म्हणजे अखिल गुजराथवासियांचे एकमेव श्रध्दास्थान आहे. ही देवी नवसाला हमखास पावते. हे स्थान अत्यंत जागृत असे आहे. ही देवी पहिल्यावर मला नाशिक येथील वणीची देवी म्हणजे सप्तश्रृंग देवीची आठवण झाली. तिच्यासारखी ही देवी पण उंच स्थानी आहे. व जाण्यास अत्यंत अवघड आहे.

अंबाजी मंदिराच्या पुढे श्री गोरक्षनाथ मंदिर, धुनी, पादुका आहेत. या ठिकाणी गोरक्षनाथांना 'शिवस्वरुप' मानतात. ते सनातन धर्माचे कुलगुरु व सुधारक आहेत. ते सर्व भारतभर फिरले. त्यांची स्थाने नेपाळ, गोरखपूर येथे आहेत. आज सुध्दा नेपाळ मध्यें गुरुगोरक्षनाथांचे शिक्के असलेली चलनी नाणी आहेत. गोरक्षमंदिराजवळच दोन खिडक्या आहेत. पाप व पुण्य अशा त्या दोन खिडक्या होत, त्या ठिकाणी पापी माणूस त्या खिडकीतून पार होऊ शकत नाही. पण पुण्यवान कितीही तगडा असला तरी पार होतो. अशी भाविकांची श्रध्दा आहे.

त्यानंतर आपले मुख्य यात्रा स्थान म्हणजे गिरनारवरील दत्तपादुकास्थान लागते. याला गिरनार हे नाव कसे पडले ते पाहू . पार्वतीने कैलासपती त्रिलोकनाथ भगवान श्रीशंकर यांचे बरोबर लग्न केले. त्यावेळी लग्नाला येणाऱ्या पाहुणे मंडळींची उठवस, आगत स्वागत करण्याचे काम पार्वतीचा भाऊ गिरीनारायण याचेकडे सोपविलेले होते व ते त्याने इतके निष्ठापूर्वक पार पाडले कि, ते पाहून भगवान विष्णू त्याच्यावर अत्यंत खूष झाले व त्याला वर दिला, आजपासून तू सर्व पर्वतांमध्ये श्रेष्ठ म्हणजे नारायण स्वरुप होशील व तुझ्याठायी सर्व देवदेवता नित्य वास करतील. योगी, साधू, संत, तपस्वी व तुझ्या आश्रयाला येतील आजपासून तुझे गिरिनारायण असे नाव होईल. पुढे त्याचा अपभ्रंश होऊन फक्त 'गिरनार' एवढेच राहिले.

गोरक्षनाथ समाधीनंतर २-३ फर्लांगावर डोंगर उतरावा लागतो या भागात वारा इतका भयानक वेगवान असतो, त्याचा जोर एवढा असतो कि त्यामुळे माणसे उडून खाली पडतात म्हणून




गिरनार पर्वताचे रेखाचित्र

**गिरनारच्या पर्वतावरील देवस्थानांचे एक दर्शन**

सूज्ञ जनांनी तिथे थोडावेळ थांबून वाऱ्याचे निरिक्षण करून, अंदाज घेऊन, त्याचा वेग, त्याची दिशा, पाहून अत्यंत सावधपणे पुढे पाऊल टाकावे. आम्ही थोडावेळ थांबून वाऱ्याचे सूक्ष्म निरीक्षण केले व नंतर निर्णय घेतला कि, वाऱ्याकडे पाठकरून कठडावजा भिंतीचा भक्कम आधार घेऊन सरपटत पायऱ्या उतराव्यात व तसे केल्यावरच आम्ही पुढला मार्ग आक्रमू शकतो. याचा अर्थ असा-तुझी परीक्षा आहे तीत पास हो, व नम्र, नतमस्तक होऊनच माझ्या पायाजवळ ये तर माझ्यापर्यंत पोचशील काही पायऱ्या उतरून गेल्यावर काय आश्चर्य बघा , वाऱ्याचा मागमूसही राहीला नाही. तीन डोंगर चढून व तीन डोंगर उतरून गेल्यावर. खडतर मार्गक्रमण केल्यावर समोर तो गिरनारचा अतिउंच असा डोंगर दिसतो.

याच अत्युच्च ठिकाणी दत्तगुरु निर्गुण पादुकारुपांत विराजमान झालेले आहे. गिरनार तलेटी ते दत्तगुरुंचे पादूका हा सर्वप्रवास १० हजार फूट उंचीचा आहे व दहा हजार पायऱ्या आहेत. नऊहजार नवशे नव्याण्णव पायऱ्या व दहा हजारावी पायरी म्हणजे दत्तगुरुंचे पवित्रस्थान. हे स्थान सर्वात उंच आहे. चारी बाजूला डोंगर दऱ्या आहेत. इथे नेहमी धुके असते.इथेही अंबाजी मंदिरा प्रमाणे भयाण वारा असतो तीन डोंगर चढता उतरतानाच माणसाची दमछाक होते. दत्तपादुका डोंगर व मागील डोंगर या दोन डोंगरांच्या घळीमधून अवघड असा कच्चा, ओबड धोबड, मोठमोठ्या पर्वतप्राय शिळांनी वेढलेला रस्ता आहे. तो अत्यंत अवघड आहे, तिथेच 'अनुसया माता मंदिर' आहे. सहज तिथे कुणी जात नाही. इथे दऱ्या इतक्या खोल आहेत कि खाली बघितल्यावर चक्कर येऊन, तोल जाऊन माणूस वाऱ्यामुळे दरीत पडण्याचा धोका आहे. पूर्वी हे ठिकाण चारी बाजूंनी मोकळे होते. यात्रेकरुंचा धोका लक्षात घेऊन आत्ताच फक्त कंबरे इतक्या उंचीचा संरक्षणात्मक कठडे वजा धक्का बांधला आहे. इथे १०X१० इतकीच जागा आहे, त्यातील अर्धी जागा दत्तपादुकांनी वेढली आहे, उर्वरित उरलेल्या जागेत १५-२० माणसेच बसू शकतात. इथे पूजा, पाठ, दानधर्म करण्यासाठी पुजारी आहेत ते सर्व व्यवस्थित करतात. आम्ही इथे जवळजवळ एक तास होतो. त्यावेळात पूजा, पोथी, स्तोत्रपठण, जप, भक्तीगीत गायन अशी दत्तगुरुंची मनसोक्त सेवा केली. आम्ही एक गोष्ट विशेष केली, ती म्हणजे संपूर्ण प्रवासभर खाणे तर सोडाच पण पाणीही एक थेंब सुध्दा प्यालो नाही, इतकी खडतर तपस्या केली म्हणून यात्रा सफल झाली. माझ्या मानवदेहाचे व मानवजन्माचे सार्थक झाले.

❑ ❑ ❑

# काही प्रमुख तीर्थ - क्षेत्रे

## (श्रीबालाजी - कांची - अयोध्या - गया)

- सौ. उषा देशमुख

**तीर्थ आणि क्षेत्र असा दोन्हीचा महिमा एकच आहे. जेथे समुद्र-सरिता-सरोवर-संगम असतो त्या पवित्र ठिकाणास तीर्थ म्हटले जाते. तर संत-देव यांच्या वास्तव्यानेपुनित झालेल्या भूमिस क्षेत्र म्हणतात. या दोन्ही गोष्टी एकत्र येतात ते 'तीर्थ-क्षेत्र' अधिक मंगल अधिक पुण्यप्रद मानले जाते. पुढील काही प्रमुख तीर्थ-क्षेत्रे भाविक भक्तांच्या श्रध्देची निधाने बनलेली आहेत.**



### तिरुपती बालाजी

आंध्र प्रदेशातील चित्तूर जिल्ह्यातील चंद्रगिरी तालुक्यातील पर्वत रांगेच्या खांद्यावर विसावलेले निसर्ग रम्य असे क्षेत्र स्थान म्हणजे तिरुपतीचे बालाजी देवस्थान. हे व्यंकटेशाच स्थान असून तिरुमलै टेकड्यावर आहे. रेल्वेच्या 'रेनीगुंठा' या जंक्शनपासून हे स्थान जवळ आहे. रेनीगुंठा ते तिरुपती रेल्वे स्टेशन १० कि. मी. असून तेथून टेकडीवर २२ कि. मी. चढून जावे लागते. मोटारीने जाता येते अनेक भाविक मुद्दाम पायी जातात. वेळ असणाऱ्यांनी मुद्दाम पायी जावे तोच खरा आनंदाचा सोहळा आहे. त्यातील निसर्ग सानिध्य हे महत्वाचे होय.

तिरुमलै टेकड्या समुद्र सपाटीपासून २८०० फूट उंच असून या टेकड्याना 'व्यंकटाचल' 'शेषाचल' 'वृषभाचल' असे म्हणतात.

तिरुपती-बालाजीची मूर्ती राजा 'तोंडमन' याने स्थापन केली असे म्हणतात. व साधारण इ. पू. ५७ ते ७८ च्या दरम्यान तिची स्थापना झाली असावी असे अभ्यासकांचे मत आहे. तिरुपतीचे भव्य मंदिर नेमके केव्हां बांधले गेले याबद्दल मात्र निश्चित माहिती मिळत नाही. म्हणून ते स्वयंभू व अनादी मानले जाते. आळवार संत व वैष्णव आचार्यांनी बालाजीचे म्हणजे भगवान श्रीनिवासाचे आपल्या भक्तिगीतांमध्ये व स्त्रोत्रांमध्ये अद्भूत

वर्णन केलेले आहे. श्रीनिवास भक्तिने ओथंबलेली पदे आजही आपले चित्त आकर्षून घेतात.

विजयनगरचे राजे तिरुपती व्यंकटेशाचे भक्त, उपासक होते. त्याकाळात तिरुपतीला वैभव प्राप्त झाले. विजयनगरचा राजा कृष्णदेवराय व राणी चिन्नादेवीचे तिरुपती येथे पुतळे असून त्याद्वारे त्यांचा या स्थळाशी असलेला भक्तिसंबंध स्पष्ट होतो. मराठी राजे रघुजी भोसले यांनी एक अत्यंत मौलव्यान पाचूचा खडा बालाजीस अर्पण करून नित्य पूजेसाठी लागणारी आर्थिक व्यवस्थाही केली होती.

बालाजीची मूर्ती काळया कुळकुळीत शाळीग्रामची असून ७-७॥ फूट उंच आहे. ही मूर्ती विष्णूची आहे. चार हातापैकी तिन हातात शंक-चक्र-कमळ आहे. तर एक हात पृथ्वीचा निर्देश करतो. या मूर्तीच्या दर्शनाने भाविकांच्या अनेक इच्छा तृप्त होतात. हे देवस्थान भारतातील सर्वात श्रीमंत असे देवस्थान असे मानले जाते. येथे १२ महिने भाविकांची प्रचंड गर्दी असते. राहण्याची उत्तम सोय व स्वच्छता हे या स्थानाचे वैशिष्ट्य आहे.

## कांची

मद्रासच्या इशान्येस चिंगलपेठ जिल्ह्यातील 'कांची' उर्फ कांजीवरम हे दक्षिण भारतातील एक प्राचीन शहर आहे. पल्लव राजाची राजधानी म्हणून ते ओळखले जाते. भारतातील प्रमुख सात पुऱ्यांमध्ये अयोध्या, मथुरा, हरिद्वार, काशी, उज्जैन, द्वारका या प्रमाणेच कांचीचा समावेश केला गेला आहे. या सात स्थळांपैकी तीन स्थळे भगवान शंकरास तर अन्य तीन स्थळे भगवान विष्णूस प्रिय मानली जातात. कांची हे एकमेव क्षेत्र दोघांनाही प्रिय मानले जाते. त्यामुळेच या शहराचे शिवकांची व विष्णुकांची असे दोन भाग झालेले आहेत.

ब्रह्मांडपुरात काशी व कांची ही दोन क्षेत्रे भगवान शंकराचे दोन नेत्र असल्याचा उल्लेख आहे. त्यामुळे वैष्णवा एवढेच शिवभक्तांनाही कांची विशेष वंदनीय आहे. कैलासनाथ मंदीर, एकांबरेश्वर मंदीर एकाम्रनाथ मंदीर, कामाक्षी देवी मंदीर, आद्य शंकराचार्यांचे 'कामकोटी पीठ' ही येथील काही प्रमुख स्थळे आहेत. 'हरिहरा नाही भेद' शंकर व विष्णू ही एकाच दैवताची दोन रुपे आहेत. त्यात भेद नाही हा संदेश कांची द्वारे भक्तांनी घेतला पाहिजे.

## अयोध्या

उत्तर प्रदेशातील फैजाबाद जिल्ह्यातील 'अयोध्या' ही रामजन्मभूमी म्हणून भारतीयांना प्राणप्रिय आहे. फैजाबादहून अयोध्या १० कि. मी. असून शरयू नदीकाठी वसलेले हे शहर रामायण काळातील राजधानी आहे. परम पवित्र अशा सप्त पुऱ्यांमध्ये अयोध्येचा अग्रक्रम आहे.

**अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका ।**
**पुरी द्वारवती चैव सप्तैता मोक्षदायिकाः ।।**

हा श्लोक म्हणतच अवघे भारतीय 'प्रातःस्मरण' करतात. ही गोष्ट भारतीय मनोभूमीत रुजलेल्या तीर्थक्षेत्र विषयक श्रध्देच्या बिजाचाच एक सुंदरसा शब्दाविष्कार आहे. या श्लोकामध्ये सात परम पवित्र मानल्या गेलेल्या सप्त पुऱ्यांचा उल्लेख असून त्या सात पुऱ्यांचे स्मरणही परममंगल मोक्षदायक मानले गेलेले आहे.

अयोध्या हे जैन धर्मियांचेही श्रध्दास्थान आहे. जैन धार्मियांच्या तीर्थंकरांपैकी पहिले तीर्थंकर भगवान आदिनाथ म्हणजेच ऋषभदेव यांची अयोध्या ही जन्मभूमी आहे. या प्रथम तीर्थंकाराशिवाय २४ पैकी अन्य २१ तीर्थंकरसुध्दा अयोध्यायेथील 'इक्ष्वाकू' वंशातीलच आहेत. त्यामुळे अयोध्या जैनांचेही श्रध्दास्थान आहे.

अयोध्या म्हणजे मंदिरांचे व मठांचेच शहर असून येथील सर्व मंदिरे दुपारी १२ ते ३ बंद असतात हे वैशिष्ट्य आहे. प्रभूरामांनी हनुमानास अयोध्येत कायम वास्तव्य करण्यास सांगितले. त्यामुळे हनुमंताचे येथे कायम वास्तव्य आहे असे लोक मानतात. महारुद्र हनुमान हे स्थान त्यामुळे विशेष प्रसिध्द आहे. शरयू नदीचे भले मोठे पात्र व सारा परिसर रमणीय आहे.

## विष्णुपदगया - बुध्दगया

गया हे क्षेत्र फल्गु नदीकाठी असून परोपकारी गयासूर राक्षसाच्या तपश्चर्येने व समर्पणाने हे क्षेत्र पावन झालेले आहे. गयासुराची कथा थोडक्यात सांगता येण्यासारखी नसून ती मुळात वाचली पाहिजे. तरच गयेचे महत्त्व आपणास कळून येते. गया हे श्राध्दविधीसाठी प्रसिध्द असे स्थान असून येथू श्राध्द केल्यावर पुन्हा-पुन्हा दरवर्षी श्राध्द करावे लागत नाही अशी हिंदू मनाची श्रध्दा आहे. येथील एका शिळेवर विष्णू चरणांचा ठसा असून त्यास विष्णूपद म्हटले जाते. या शिळेवर गयागदाधराचे म्हणजेच भगवान विष्णुचे मंदीर आहे. म्हणून गयेस विष्णुगया म्हटले जाते. येथे श्राध्द विधी करून पितरांना मुक्ती दिली जाते. म्हणून गयेस 'पितृगया' असेसुध्दा म्हटले आहे.

*गदाधरं विष्णुपदं अष्टादश पदांनपि ।*
*वंदे अक्षय वट फल्गु लक्ष्मीं गौरीं गयेश्वरी ।।*

या श्लोकातील क्रमानुसार भाविक गयेतील श्रध्दास्थानांचे दर्शन घेतात. गयेतील पिंडदान हे सर्व श्रेष्ठ मानले गेले आहे.

गयेपसून जवळच सात मैलावर 'बुध्दगया' आहे. येथेच एका पिंपळ वृक्षाखाली गौतम बुध्दास बोध प्राप्त झाला व तो सिध्दार्थाचा बुध्द झाला. तो वृक्ष पुढे बोधिवृक्ष म्हणूनच गौरविला गेला. त्यावृक्षाच्या त्या स्थळाच्या दर्शनार्थ भारतातील नव्हे तर चीन, जपान, थायलंड, श्रीलंका येथून बौध्द यात्रिक हजारोंच्या संख्येने येतात. त्यामुळे बुध्दगया हे स्थान अंतरराष्ट्रीय स्तरावर सर्व दूर ख्यातकिर्त झालेले आहे. चीनी प्रवासी ह्यूएनत्संग याने केलेले बुध्द गयेचे वर्णन जिज्ञासू वाचकांनी आवर्जून वाचावे व या स्थानाचे अगाध महात्म्य समजून घ्यावे. सिध्दार्थांच्या साधनेने सत्वसंपन्न झालेला हा परिसर आजही मानव जातीला शाश्वत शांतीचा बोध देत आहे.

विष्णुगयेला 'पितृगया' म्हटले जाते तसे गुजराथमधील सिध्दपूरला 'मातृगया' म्हटले जाते. मातृगया हे मेहसाणा जिल्ह्यातील सरस्वती नदीवर वसलेले तीर्थ - क्षेत्र आहे.

❑ ❑ ❑



* श्रीक्षेत्र आळंदी, इंद्रायणी नदीचा परिसर.

# मला आवडलेले देवक्षेत्र
## वेळणेश्वर व अंबव
### (कोकण)

**- स. कृ. देवधर**

**कोकण भूमीत अनेक तीर्थक्षेत्रे-संतस्थाने-देवक्षेत्रे आहेत. त्या सर्वांची माहिती द्यावयाची तर एक ग्रंथच होईल. अनेक क्षेत्रे बहुतेकांना परिचित आहेत. वेदमूर्ती स. कृ. देवधर यांनीं अंबव या विशेष प्रसिध्द नसलेल्या नव्या क्षेत्राचा येथे परिचय करून दिलेला आहे.**

'**सागरे सर्व तीर्थानि**' सागरामध्ये सर्व तीर्थांची वसती आहे असे एक पुराणवचन आहे. हे पाहिले म्हणजे असें म्हणावेसे वाटते की भारतवर्षाला या सर्व तिर्थांनी आणि तिर्थप्रमुखांनी पूर्णपणे वेढून टाकले आहे. भारताच्या तीन दिशांना असा हा समुद्र आहे तर उत्तरेला कविकुलगुरू कालिदासाने कुमारसंभव महाकाव्याच्या पहिल्याच श्लोकात -

**अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराजा ।।**

देवतात्मा म्हणून ज्याचा गौरव केला आहे तो पवित्र हिमालय आहे. म्हणूनच की काय भारतवर्षाला देवभूमी म्हणतात.

भारताच्या पश्चिमेला अथांग सिन्धुसागर आहे. याचा स्पर्श सतत कोंकणभूमीला होत असतो. असे म्हणतात की क्षत्रिय कुलभूषण प्रभु रामचंद्रांच्या पूर्वजामुळे - राजा सगरामुळे समुद्र जन्माला आला. क्षत्रियशून्य पृथ्वी करण्याच्या प्रतिज्ञेप्रमाणे, स्वतःच्या पराक्रमामुळे परशुरामाने आपले संकल्पित कार्य केले. त्यानंतर त्याला ज्यावेळी विसावा घ्यावासा वाटला तेव्हां तो सह्यागिरीच्या शिखरावर आला. क्षत्रियकुलामुळे जन्माला आलेला अथांग सागर त्याने पाहिला आणि त्याला दूर हटविण्यासाठी त्याने आपले विजयी धनुष्य सज्ज करून समुद्रावर रोखले तेव्हां सागर आपोआपच मागे हटला आणि त्याने परशुरामाला जागा करून दिली तेव्हांपासून समुद्र परशुरामाचे नाही पण परशुरामाच्या पदस्पर्शाने पवित्र झालेल्या भूमीचे आपल्या लाटांनी प्रक्षालन करीत राहिला आहे. त्याचा भाव पाहून परशुरामाने सागराला कधीच त्रास दिला नाही. ती परशुराम भूमी वृक्षलतांनी नटू लागली आणि त्यांच्या आश्रयाने लोकांनी वस्ती करायला सुरवात केली. निसर्गाच्या सानिध्यांत सतत राहिल्याने तेथील निवासी प्रज्ञावंत झाले. परशुरामाने आपले स्थान निसर्गरम्य डोंगर माथ्यावर निर्माण केले. त्याबरोबर तेथील प्रज्ञावंतांनी परशुरामाच्या संतोषासाठी सागरतीरावर त्याच्या गुरूंची मंदिरे स्थापन केली (भगवान शंकराने परशुरामाला धनुर्वेद शिकविला) त्या मंदिरापैकीकोकणची दैवते म्हणून ज्यांचा सर्व गौरव होतो अशा काही मंदिराचे दर्शन अक्षरांकित घडावे म्हणून हा प्रयत्न आहे.

कोकणच्या परिसरांत प्रस्तूतच्या सीमांप्रमाणे ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग असे चार जिल्हे येतात. या सर्व जिल्ह्यांत शिवांची अनेक क्षेत्रे आहेत. त्याचप्रमाणे अन्य देवतांचीही पवित्र स्थाने आहेत. या सर्वांचा या बरोबर या परशुराम भूमित अन्य काही देवतांनासुध्दा विसावा घ्यावासा वाटला म्हणून अन्य देवातासुध्दा या भूमीत विसावल्या असल्याच दिसून येते शिवांच्या बरोबर घडकाई, दुर्गा, विन्ध्यावासिनी वगैरे देवता तर वेताळ, भैरव, गणपती या सर्व परिचित देवांनीसुध्दा या किनारपट्टींची तीर्थक्षेत्र निर्माण केले असे जरी असले तरी भारतात सुध्दा क्वचित असणारे सूर्य मंदिर या भूमीत आहे. इतरांना तर सोडाच पण खुद्द परशुराम भूमीत वास करणाऱ्यांना सुध्दा हे स्थान इतके परिचीत

नाही. तसे पाहिले तर कोणार्क येथील सूर्याचें मंदिर सर्वज्ञात असेले तरी आज मात्र याची अवस्था अत्यंत दयनीय आहे. परंतु कोकणातल्या या सूर्य-मंदिराचा तेथील लोकांनी नुकताच जीर्णोध्दार केला आणि लोकांचे लक्ष इकडे वेधण्याचा प्रयत्न केला.

रत्नागिरी जिल्हा अरुंद पण लांबलचक आहे. याच्या मध्यभागी संगमेश्वर तालुका आहे. या तालुक्यात माखजन म्हणून एक प्रसिध्द गाव आहे. या तालुक्याच्या आग्नेय भागात हे गाव येते. या गावाच्या चार किलोमीटर अंतरावर अंबव नावाचे एक लहान खेडे आहे. सर्व बाजूंनी डोंगराच्या संरक्षक भिंती उभ्या केल्या असून त्यांच्या पायथ्याशी सर्वत्र भातशेती आहे आणि या सर्वांच्या मध्ये हे दुमदार सूर्यमंदिर आहे.

या मंदिराची रचना मोहक आहे. बाहेर एक विस्तीर्ण सभागृह, आंत गर्भागार आणि त्यामध्ये अडीच फूट उंचीची काळ्या शाळिग्राम शिळेची काळीभोर मूर्ती. एका दगडी चौथऱ्यावर या मूर्तीची प्रस्थापना करण्यांत आली आहे. याचे वैशिष्ट्य असे की उभ्याने या मूर्तीची पूजा करावी लागते. यावेळी ज्यावेळी साधक पूजेसाठी मूर्तीच्या समोर उभा राहतो तेव्हां या मूर्तीचे पाय साधकाच्या छातीसमोर येतात. (बसून अगर उभ्याने मूर्तीची पूजा करतांना मूर्तीचे पाय साधकाच्या छातीसमोर यावेत असा शास्त्रीय दण्डक आहे.) त्यामुळे या मूर्तीची प्रतिष्ठा करतांना शास्त्रवचनांना मुरड न घालता केल्याचे दिसून येते. या मूर्तीकडे पाहिले म्हणजे सर्व प्रथम लक्ष जात ते सूर्याच्या एक चाकी रथाकडे. या रथाला सात घोडे जुंपलेले असून ते साधकाच्या दिशेने वेगाने दौडत येत असल्याचे जाणवते. घोडे धावू लागले म्हणजे त्यांचा जो अंगविक्षेप होतो तो देखील कोरण्यांत आला आहे. या घोड्यांचे लगाम हाती घेवून सूर्याचा सारथी अरुण बसला आहे.

अरुण हा काश्यप ऋषींचा-विनतेचा पुत्र हा गरुडाचा ज्येष्ठ बंधु - यमाला सहाय्य करणारे जटायु आणि संपाति हे या अरुणाचे पुत्र. अरुण चरणहीन आहे. त्याचे दुःख त्याला नाही. परंतु यामुळे आपणास सूर्याचे सारथ्यकर्म करून त्याची उपासना करण्याची संधी मिळाली म्हणून त्याला अपार समाधान वाटले. त्याचे ते समाधान या मूर्तीमध्ये समाविष्ट असलेल्या अरुणाच्या तोंडावर अगदी स्पष्टपणे दिसते. त्याचा चेहरा अगदी प्रसन्न आहे.

अरुणाच्या मागे एक भव्य - दिव्य कमळ आहे. त्याच्या पाकळ्या अत्यंत स्पष्टपणे आकारण्यात आल्या आहेत. असे कमळ म्हणजे सूर्याचे आसन होय. या कमळाच्या मध्यभागी सूर्याची मनोरम मूर्ती आहे.

ध्येयः सदा सावितृमंडलमध्यवर्ती ।

नारायणः सरसिजासन् सन्निविष्टः ।।

केयूरवान मकरकुण्डलवान्किरीटी ।

हारी रिरण्यमयवपुः धृतशंखचक्रः ।।

या पौराणिक श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणे मुकुट मकरकुण्डल धारण करणारी, एका हातांत शंख आणि एका हातांत चक्र धारण करणारी, तेजोवान शरीरधारी, सुहास्य वदनी अशी ही मूर्ती त्या कमलासनावर प्रतिष्ठित झालेली आहे.

तसें पाहिले तर ही मूर्ती अगदी अलीकडेच प्रस्थापित करण्यांत आलेली आहे. असे सांगितले जाते की पूर्वीची मूर्ती भंग पावल्यामुळे ही नवीन मूर्ती प्रतिष्ठित करण्यांत आली. पाहिल्या मूर्तीत आणि या मूर्तीत जराही फरक नाही.

कोकणांतील पोंक्षे आडनावाच्या लोकांचे हे कुलदैवत आहे. दरवर्षी माघशुध्द प्रतिपदा ते रथसप्तमी पर्यंत सर्वत्र विखुरलेली पोंक्षे कुंटुंबीय येथे एकत्र येतात आणि आपलेपणाने हा उत्सव साजरा करतात. या उत्सवाच्या निमित्ताने मंदिरात कीर्तन प्रवचन यज्ञयाग वगैरे कार्यक्रम ज्याप्रमाणे होतात त्याप्रमाणे याच मंडळींनी सादर केलेला नाटकाचा प्रयोग देखील होतो. गांवजेवण होऊन हा समारंभ संपतो. हा सर्व समारंभ देखणा होतो असेच म्हणावे लागेल.

अंबव येथे येण्यासाठी मुंबई-माखजन् (अंतर २९३ कि. मी.) पुणे माखजन (२४७ कि. मी.) अशा थेट राज्य परिवहन मंडळाच्या गाड्या आहेत. माखजनच्या अलिकडे तीन किलोमीटरवर अंबव फाटा आहे. तेथे उतरुन दोन किलोमीटर चालत जाता येते. किंवा माखजन येथून रिक्षाने देखील जाता येते. अशा या सूर्यमंदिरात जाऊन एकदां तरी सूर्याचे दर्शन घेवून कृतार्थ व्हावे.

## वेळणेश्वर

सिन्धुसागराच्या किनाऱ्यावर जी अनेक शिव-मंदिरे आहेत त्यामध्ये रत्नागिरी जिल्ह्याच्या गुहागर तालुक्यातील वेळणेश्वर हे एक महत्वाचे देवतीर्थ आहे. हे मंदीर नारळी, पोफळी, आंबा, काजू, फणस, कोकम वगैरे फलवान आणि धनद वृक्षांच्या आणि जांभळ्या दगडांच्या टेकड्यांनी बंदिस्त केलेल्या खोलगट भागांत आहे. पश्चिमेला अथांग निळाशार सागर पसरलेला असून मंदीर आणि सागर यांच्यामध्ये घरं, नारळ-सुपारीच्या बागा विखुरलेल्या आहेत. वेळणेश्वर गांव तस मोठ नाही. खेडेगांवच आहे, पण निसर्गश्रीमंत आहे. चिपळूण हे रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्ह्यातील बाजाराचे एक मोठे गांव. तेथून पश्चिमेला साधारण छत्तीस किलोमीटरवर गुहागर म्हणून तालुक्यांचे ठिकाण आहे. गुहागर पासून साधारण पंधरा किलोमीटर अंतरावर वेळणेश्वर हे स्थान आहे. गुहागर तेथून निघाल्यानंतर दक्षिणेकडे जाणारा रस्ता जयगड

खाडीपर्यंत जातो. या रस्त्यावर पंधरा किलोमीटरवर वेळणेश्वर आणि तेथून पुढे सात किलोमिटरवर हेदवी हे स्थान आहे. हे स्थान गणपतीसाठी प्रसिध्द आहे. वेळणेश्वरला गेलेला मनुष्य हेदवीला जातोच. ही दोन्ही ठिकाणे अतीव रम्य आहेत.

असा एक पौराणिक बोलबाला आहे असे म्हणतात. एकदा रावण शिवांचे आत्मलिंग घेऊन कैलासावरून समुद्र काठाने लंकेकडे निघाला. जाता जाता मध्ये आलेल्या एका दगडाला त्याचा पाय लागला आणि या दगडाचा एक टवका उडाला. हा दगड पूर्वी शिवलिंगाप्रमाणे गोल होता. हे रावणाने पाहिले आणि तो शिवांना म्हणाला देवा हा एक अपशकुन आहे. तो अपशकुन नाहीसा करण्यासाठी रावणाने शिवाचे आत्मलिंग गळयांत अडकवून त्या जागी पूजा प्रार्थना केली. तेव्हां तेथून सिंहनाद झाला. या नादाने शिवानी हा अपशकुन नाहीसा केला असे त्याला वाटले. त्याने पुन्हा तेथे पूजा वगैरे केली तेव्हां तो दगड ओला झाला. हे पाहून रावण पुढे निघून गेला. यानंतर त्या शिवपाषाणाकडे कोणीच पाहिले नाही. अनेक वर्षे तो दगड तसाच पडून होता. समुद्राच्या भरतीचे पाणी येथपर्यंत येत असे या पाण्याबरोबर समुद्रातील वाळु आणि चिखल देखील येत असे. त्याने हा भाग दलदलीचा झाला. इतके असूनही तेथेच एक गोड पाण्याचा झरा वहात होता. त्या ओढ्याचे पाणी गोड आणि पाचक असे होते. या पाण्यावर गाईगुरे पाण्यासाठी येत आणि दुपारी विश्रांती घेत. असा बराच काळ लोटला. पुढे तेथे राहणाऱ्या एका सुहासीनीला एक दृश्य दिसले. सकाळी पाणी भरण्यासाठी ती झऱ्यावर आली. तेव्हां एक पांढरी गाय या दलदलीच्या भागांत एके ठिकाणी संथपणे उभी असून एकीकडे रवंथ करीत आहे. तर तिच्या आंचळातून दुधाचे थेंब एका ठराविक ठिकाणी सारखे पडत आहेत. दोनतीन दिवस तिने हे लक्षपूर्वक पाहिले. तिला आश्चर्य वाटले तिने ते आपल्या पतीला सांगितले. गावांत ही वार्ता पसरली. सर्व लोकांनी हे दृश्य पाहिले. त्यानांही आश्चर्य वाटले. तेथे खणून पाहण्याचा विचार झाला सर्व लोक कामाला लागले. तेथील चिखल दूर करता करता तेथे शिवलिंगाचा आकार असलेला एक दगड आढळला. ते शिवलिंग आहे असे म्हणून त्याची पूजा अर्चा होऊ लागली.

त्यानंतर गाडगीळ नावाच्या एका सावकाराने आपले बरेच दिवस वसूल होत नसलेले कर्ज वसूल व्हावे म्हणून या मंदिरात जाऊन शिवांची पूजा केली आणि त्याला नवस केला. थोड्याच दिवसांत त्याचे कर्ज वसूल झाले. शिवाच्या प्रसादाने आपणास हा पैसा प्राप्त झाला आहे असे मानून त्याने शिवलिंगावर एक देऊळ बांधले.

या मंदिराच्या गर्भगारात दोन भाग आहेत. बाहेरच्या बाजूला गणपतीची मूर्ती प्रतिष्ठीत करण्यात आली आहे. आतल्या गाभाऱ्यात स्वयंभू शिवलिंग आहे. हे शिवलिंग नेहमी सारखे गोल आकाराचे नाही. पर्वत उताराप्रमाणे या लिंगाचा आकार आहे. पर्वत शिखराप्रमाणे असलेल्या या लिंगाची उंची तेरा इंच असून तेथून पर्वत उताराप्रमाणे भाग आहे. गाभारा विस्तीर्ण असून लघुरुद्रासाठी आत अकरा भाऊ सहजपणे बसू शकतात. या मंदिराचे आणखी वैशिष्ट्य म्हणजे महादेवांचा नंदी बाहेरच्या गर्भागारात नसून देवळाच्या बाहेर त्याचे स्वतंत्र मंदिर बांधण्यात आले आहे. नंदीच्या मागच्या बाजूस कालभैरवाचे मंदीर आहे. मच्छीमार लोकांचा हा देव आहे या लोकांनीच एक मंडप देवळा समोर बांधला आहे. देवळाचे आवार दोनशे फुटापेक्षा किंचीत अधिक लांबीरुंदीचे आहे. या आवारांत रामेश्वर, गणपती आणि लक्ष्मीनारायण यांची स्वतंत्र देवळे आहेत. लक्ष्मीनारायणाची मूर्ती अत्यंत देखणी आणि बोलकी आहे. आवारांत एक विहीर आहे, समुद्रा काठी असून सुध्दा या विहीरीचे पाणी गोड आहे.

श्रावणी सोमवार आणि महाशिवरात्रीपासून होळी पोर्णीमेपर्यंत सतरा दिवस येथे मोठा उत्सव असतो. या उत्सवाला अनेक ठिकाणाहून लोक येतात. त्या प्रमाणे मच्छीमार लोक देखील येथे उपस्थित राहून हा उत्सव साजरा करतात. गोखले, गाडगीळ, खरे, चाफेकर या कुळांचे वेळणेश्वर हे कुलदैवत आहे.

वेळणेश्वर हे गाव मुंबई पासून ३४० कि. मी. असून मुंबई-बोऱ्या किंवा मुंबई वाधांबे अशी राज्य परिवहन मंडळाच्या गाड्यांची सोय आहे. ही गाडी वेळणेश्वर देवळाजवळ येते. पुणे ते वेळणेश्वर (भोर मार्गे) २७० कि. मी. (कोयना मार्गे) २९७ कि. मी. आहे. पुणे - गुहागर अशी थेट गाडी असून गुहागर पासून गाड्या रिक्षा, खाजगी मोटारी वगैरेंची सोय आहे. येणाऱ्या भक्तांसाठी तेथे एक भक्तनिवास बांधण्यात आलेले आहे. या ठिकाणी निवास - भोजनाची सोय आहे, शिवाय धार्मिक कार्यासाठी भिक्षुक पण उपलब्ध आहेत. मागे पाण्याच्या झऱ्याचा उल्लेख करण्यांत आला आहे. या जलप्रवाहाभोवती एक तळे बांधण्यात आले आहे. हे तळे पेशव्यांनी बांधले असे म्हणतात. सध्या ह्या तळयात खूप (जवळ जवळ सहा सात फूट) गाळ साचला आहे. तो जर दूर केला तर वेळणेश्वरच्या पंचक्रोशीला पाणी पुरेल इतका मोठा साठा तेथे आहे. देवळापासून अर्धा किलोमीटर अंतरावर समुद्र असून किनाऱ्यावर सर्वत्र वाळू आहे.

शेवटी असे सांगावेसे वाटते की ही दोन्ही तीर्थक्षेत्रे त्याचे जोपर्यंत पर्यटन क्षेत्र म्हणून शासनाने रुपांतर करीत नाही तोपर्यंत पाहून घ्यावे. कारण एकदा ते पर्यटन क्षेत्र झाले की तीर्थक्षेत्राचे वैभव संपेल. शुचिता आणि पावित्र्य लयाला जाईल. धार्मिक शिस्त पायाखाली तुडविली जाईल आणि ते एक उपभोग क्षेत्र निर्माण होईल.

❑ ❑ ❑